|| श्री गणेशाय नमः ||

|| श्री दत्तात्रेयाय नमः ||




|| श्री स्वामी समर्थ ||

# श्री स्वामी समर्थ चरित्र सारामृत

स्वामी समर्थांचा आशीर्वाद "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे"

# अध्याय १

**॥ पहिला अध्याय ॥**

श्री गणेशाय नमः ॥ श्री सरस्वत्यै नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥ श्री कुलदेवतायै नमः ॥

श्री अक्कलकोटनिवासी - पूर्णदत्तावतार - दिगंबर - यतिवर्य स्वामिराजाय नमः ॥

श्लोक ... ब्रह्मानंद परमसुखदं केवलं ज्ञानमूर्ति । द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम् ॥
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं । भावातीतं त्रिगुणरहितं सदगुरुं तं नमामि ॥
जयजय श्रीजगरक्षका । जयजयाजी भक्तपालका । जयजय कलिमलनाशका । अनादिसिद्ध जगदगुरु ॥१॥
जयजय क्षीरसागर विलासा । मायाचक्रचालका अविनाशा । शेषशयन अनंतवेषा । अनामातीता अनंता ॥२॥
जयजयाजी गरुडवाहना । जयजयाजी कमललोचना । जयजयाजी पतितपावना । रमारमणा विश्वेशा ॥३॥
मेघवर्ण आकार शांत । मस्तकी किरीट विराजित । तोच स्वयंभू आदित्य । तेज वर्णिले न जाय ॥४॥
विशाळ भाळ आकर्ण नयन । सरळ नासिका सुहास्य वदन । दंतपंक्ति कुंदकळ्यांसमान । शुभ्रवर्ण विराजती ॥५॥
रत्नमाला ह्रदयावरी । जे कोटी सूर्याचे तेज हरी । हेममय भूषणे साजिरी । कौस्तुभमणि विशेष ॥६॥
वत्सलांच्छनाचे भूषण । तेचि प्रेमळ भक्तीची खूण । उदरी त्रिवळी शोभायमान । त्रिवेणीसंगमासारखी ॥७॥
नाभिकमल सुंदर अति । जेथे विधात्याची उत्पत्ती । की चराचरा जन्मदाती । मूळ जननी तेचि पै ॥८॥
जानूपर्यंत कर शोभती । मनगटी कंकणे विराजती । करकमलांची आकृति । रक्तपंकजासमान ॥९॥
भक्ता द्यावया अभय वर । सिद्ध सर्वदा सव्य कर । गदा पद्म शंख चक्र । चार हस्ती आयुधे ॥१०॥
कांसे कसिला पीतांबर । विद्युल्लतेसम तेज अपार । कर्दळीस्तंभापरि सुंदर । उभय जंघा दिसताती ॥११॥
जेथे भक्तजन सुखावती । ज्याच्या दर्शने पतित तरती । ज्याते अहोरात्र ध्याती । नारदादि ऋषिवर्य ॥१२॥
ज्याते कमला करे चुरीत । संध्यारागा समान रक्त । तळवे योग्य चिन्हें मंडित । वर्णिता वेद शीणले ॥१३॥
चौदा विद्या चौसष्ट कला । ज्याते वर्णिता थकल्या सकळा । ऐशा त्या परम मंगला । अल्पमती केवि वर्णू ॥१४॥
नारदादि मुनीश्वर । व्यास वाल्मीकादि कविवर । क्रमू न शकले महिमांवर । तेथे पामर मी काय ॥१५॥
जो सकळ विश्वाचा जनिता । समुद्रकन्या ज्याची कांता । जो सर्व कारण कर्ता । ग्रंथारंभी नमू तया ॥१६॥
त्या महाविष्णूचा अवतार । गजवदन शिवकुमर । एकदंत फरशधर । अगम्य लीला जयांची ॥१७॥
जो सकळ विद्यांचा सागर । चौसष्ट कलांचे माहेर । ऋद्धि सिद्धीचा दातार । भक्त पालक दयाळू ॥१८॥
मंगल कार्यी करिता स्मरण । विघ्ने जाती निरसोन । भजका होई दिव्य ज्ञान । वेदांतसार कळे पां ॥१९॥
सकल कार्यारंभी जाणा । करिती ज्याच्या नामस्मरणा । ज्याच्या वरप्रसादे नाना । ग्रंथरचना करिती कवी ॥२०॥
तया मंगलासी साष्टांग नमन । करुनी मागे वरदान । स्वामी चरित्र सारामृत पूर्ण । निर्विघ्नपणे होवो हे ॥२१॥
जिचा वरप्रसाद मिळता । मूढ पंडित होती तत्त्वता । सकळ काव्यार्थ येत हाता । ती ब्रह्मसुता नमियेली ॥२२॥
मूढमती मी अज्ञान । काव्यादिकांचे नसे ज्ञान । माते तू प्रसन्न होवोन । ग्रंथरचना करवावी ॥२३॥
जो अज्ञानतिमिरनाशक । अविद्याकाननच्छेदक । जो सदबुद्धीचा प्रकाशक । विद्यादायक गुरुवर्य ॥२४॥
ज्याचिया कृपेकरोन । सच्छिष्या लाधे दिव्यज्ञान । तेणेच जगी मानवपण । येतसे की निश्चये ॥२५॥
मी मतिमंद अज्ञ बाळ । घेतली असे थोर आळ । ती पुरविणार दयाळ । सदगुरुराज आपणची ॥२७॥
नवमास उदरी पाळिले । प्रसववेदनांते सोशिले । कौतुके करुनी वाढविले ॥२८॥
जननीजनका समान । अन्य दैवत आहे कोण । वारंवार साष्टांग नमन । चरणी तयांच्या करीतसे ॥२९॥
ब्रह्मा विष्णु महेश्वर । तिन्ही देवांचा अवतार । लीलाविग्रही अत्रिकुमर । दत्तात्रेय नमियेला ॥३०॥
तीन मुखे सहा हात । गळा पुष्पमाळा शोभत । कर्णी कुंडले तेज अमित । विद्युल्लतेसमान ॥३१॥
कामधेनु असोनि जवळी । हाती धरिली असे झोळी । जो पाहता एक स्थळी । कोणासही दिसेना ॥३२॥
चार वेद होऊनी श्वान । वसती समीप रात्रंदिन । ज्याचे त्रिभुवनी गमन । मनावेगे जात जो ॥३३॥
त्या परब्रह्मासी नमन । करोनि मागे वरदान । स्वामी चरित्र सारामृत पूर्व । होवो कृपेने आपुल्या ॥३४॥
वाढला कलीचा प्रताप । करु लागले लोक पाप । पावली भूमि संताप । धर्मभ्रष्ट लोक बहू ॥३५॥

पहा कैसे दैव विचित्र । आर्यावर्ती आर्यपुत्र । वैभवहीन झाले अपार । दारिद्र्य, दुःखे भोगिती ॥३६॥
शिथिल झाली धर्मबंधने । नास्तिक न मानिती वेदवचने । दिवसेदिवस होमहवने । कमी होऊ लागली ॥३७॥
सुटला धर्माचा राजाश्रय । अधर्मप्रवर्तका नाही भय । उत्तरोत्तर नास्तिकमय । भरतखंड जाहले ॥३८॥
नाना विद्या आणि कला । अस्तालागी गेल्या सकला । ऐहिक भोगेच्छा बळावल्या । तेणे सुटला परमार्थ ॥३९॥
धर्मसंस्थापनाकारणे । युगायुगी अवतार घेणे । नानाविध वेष नटणे । जगत्पतीचे कर्तव्य ॥४०॥
लोक बहु भ्रष्ट झाले । स्वधर्मातें विसरले । नास्तिकमतवादी मातले । आर्यधर्माविरुद्ध ॥४१॥
मग घेतसे अवतार । प्रत्यक्ष जो का अत्रिकुमर । अक्कलकोटी साचार । प्रसिद्ध झाला स्वामीरुपे ॥४२॥
कोठे आणि कोणत्या काळी । कोण्या जातीत कोणत्या कुळी । कोण वर्णाश्रम धर्म मुळी । कोणासही कळेना ॥४३॥
ते स्वामी नामे महासिद्ध । अक्कलकोटी झाले प्रसिद्ध । चमत्कार दाविले नानाविध । भक्त मनोरथ पुरविले ॥४४॥
त्यांसी साष्टांग नमोनी । करी प्रार्थना कर जोडोनी । आपुला विख्यात महिमा जनी । गावयाचे योजिले ॥४५॥
तुमचे चरित्र महासागर । पावेन कैसा पैलतीर । परि आत्मसार्थक करावया साचार । मीन तेथे जाहलो ॥४६॥
किंवा अफाट गगनसमान । अगाध आपुले महिमाना अल्पमती मी अज्ञान । आक्रमण केवी करु ॥४७॥
पिपीलिका म्हणे गिरीसी । उचलून घालीन काखेसी । किंवा खद्योत सूर्यासी । लोपवीन म्हणे स्वतेजे ॥४८॥
तैसी असे माझी आळ । बाळ जाणूनी लडिवाळ । पुरविता तू दयाळ । दिनबंधू यतिवर्या ॥४९॥
कर्ता आणि करविता । तूंचि एक स्वामीनाथा । माझिया ठाई वार्ता । मीपणाची नसेची ॥५०॥
ऐसी ऐकुनिया स्तुती । संतोषली स्वामीराजमूर्ति । कविलागी अभय देती । वरदहस्ते करोनी ॥५१॥
उणे न पडे ग्रंथात । सफल होतील मनोरथ । पाहूनी आर्यजन समस्त । संतोषतील निश्चये ॥५२॥
ऐसी ऐकोनि अभयवाणी । संतोष झाला माझिया मनी । यशस्वी होवोनी लेखणी । ग्रंथसमाप्तीप्रति पावो ॥५३॥
आता नमू साधूवृंद । ज्यासी नाही भेदाभेद । जे स्वात्मसुखी आनंदमय । सदोदित राहती ॥५४॥
मग नमिले कविश्वर । जे शब्दसृष्टीचे ईश्वर । ज्यांची काव्ये सर्वत्र । प्रसिद्ध असती या लोकीं ॥५५॥
व्यास वाल्मीक महाज्ञानी । बहुत ग्रंथ रचिले ज्यांनी । वारंवार तयांच्या चरणी । नमन माझे साष्टांग ॥५६॥
कविकुलमुकुटावतंस । नमिले कवि कालिदास । ज्यांची नाट्यरचना विशेष । प्रिय जगीं जाहली ॥५७॥
श्रीधर आणि वामन । ज्यांची ग्रंथरचना पाहोन । ज्ञातेही डोलाविती मान । तयांचे चरण नमियेले ॥५८॥
ईशचरणी जडले चित्त । ऐसे तुकारामादिक भक्त ग्रंथारंभी तया नमित । वरप्रसादाकारणे ॥५९॥
अहो तुम्ही संत जनी । मज दीनावरी कृपा करोनी । आपण हृदयस्थ राहोनी । ग्रंथरचना करवावी ॥६०॥
आता करु नमन । जे का श्रोते विचक्षण । महाज्ञानी आणि विद्वान । श्रवणी सादर बैसले ॥६१॥
महापंडित आणि चतुर । ऐसा श्रोतृसमाज थोर । मतिमंद मी त्यांच्यासमोर । आपले कवित्व केवी आणू ॥६२॥
परी थोरांचे लक्षण । एक मला ठाउके पूर्ण । काही असता सदगुण । आदर करिती तयाचा ॥६३॥
संस्कृताचा नसे गंध । मराठीही न ये शुद्ध । नाही पढलो शास्त्रछंद । कवित्वशक्ती अंगी नसे ॥६४॥
परी हे अमृत जाणोनी । आदर धरावा जी श्रवणी । असे माझे असंस्कृत वाणी । तियेकडे न पहावे ॥६५॥
न पाहता जी अवगुण । ग्राह्य तितुकेंच घ्यावे पूर्ण । एवढी विनंती कर जोडोनी । चरणी आपुल्या करीतसे ॥६६॥
स्वामींच्या लीला बहुत । असती प्रसिद्ध लोकांत । त्या सर्व वर्णिता ग्रंथ । पसरेल समुद्रसा ॥६७॥
त्या महोदधीतुनी पाही । अमोल मुक्ताफळे घेतली काही । द्यावया मान सुज्ञाही । अनमान काही न करावा ॥६८॥
की हे उद्यान विस्तीर्ण । तयामाजी प्रवेश करीन । सुंदर कुसुमे निवडोन । हार त्यांचा गुंफिला ॥६९॥
कवि होवोनिया माळी । घाली श्रोत्यांच्या गळी । उभा ठाकोनि बद्धांजुळी । करी प्रार्थने सप्रेमे ॥७०॥
अहो या पुष्पांचा सुवास । तृप्त करील आपुले मानस । हा सुगंध नावडे जयास । तेचि पूर्ण अभागी ॥७१॥
आता असोत हे बोल । पुढे कथा बहु अमोल । वदविता स्वामी दयाळ । निमित्त मात्र विष्णुकवि ॥७२॥
वैराग्ये प्रत्यक्ष शंकर । तेजे जैसा सहस्त्रकर । दुष्टा केवळ सूर्यपुत्र । भक्ता मातेसमान ॥७३॥
यतिराजपदकल्हार । विष्णुकवि होऊनी भ्रमर । ज्ञानमधुस्तव साचार । रुंजी तेथे घलीतसे ॥७४॥
स्वामी चरित्र सारामृत ॥ नाना प्राकृत कथासंमत । आदरे भक्त परिसोत । प्रथमोऽध्याय गोड हा ॥७५॥
श्रीशंकरार्पणमस्तु । श्री श्रीपादश्रीवल्लभार्पणमस्तु ।
इति श्री स्वामी चरित्र सारामृते मंगलाचरणं नाम प्रथमोऽध्यायः ॥१॥

स्वामी समर्थांचा आशीर्वाद "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे"

## अध्याय २

**॥ दुसरा अध्याय ॥**

श्री गणेशाय नमः ।

कामना धरोनी जे भजती । होय त्यांची मनोरथपूर्ति । तैसेचि निष्काम भक्ताप्रती । कैवल्यप्राप्ती होतसे ॥१॥

नृसिंहसरस्वती प्रगट झाले । अगणित पापी तारिले । कर्दळीवनी गुप्त जहाले । गुरुचरित्री ती कथा ॥२॥

पुढे लोकोद्धाराकारणे । भाग पडले प्रगट होणे । धुंडिली बहुत पट्टणे । तेचि स्वामी यतिवर्य ॥३॥

स्वामींची जन्मपत्रिका । एका भक्ते केली देखा । परी तिजविषयी शंका । मनामाजी येतसे ॥४॥

गुरुराज गुप्त झाले । स्वामीरुपे प्रगटले । त्यांचे शकप्रमाण न मिळे । म्हणोनि शंका पत्रिकेची ॥५॥

ते केवळ अनादिसिद्ध । खुंटला तेथें पत्रिकावाद । लोकोद्धारासाठी प्रसिद्ध मानवरुपे जाहले ॥६॥

अक्कलकोटा - माझारी । राचाप्पा मोदी याचे घरी । बैसली समर्थांची स्वारी । भक्तमंडळी वेष्टित ॥७॥

साहेब कोणी कलकत्त्याचा । हेतू धरोनी दर्शनाचा । पातला त्याच दिवशी साचा । आदर तयाचा केला की ॥८॥

त्याजसवे एक पारसी । आता होता दर्शनासी । ते येण्यापूर्वी मंडळीसी । महाराजांनी सुचविले ॥९॥

तीन खुर्च्या आणोनी बाहेरी । मांडा म्हणती एके हारी । दोघांसी बैसवोनी दोहोंवरी । तिसरीवरी बैसले आपण ॥१०॥

पाहोनी समर्थांचे तेज । उभयतांसी वाटले चोज । साहेबाने प्रश्न केला सहज । आपण आता कोठूनी ॥११॥

स्वामीनी हास्यमुख करोनी । उत्तर दिलें तयालागोनी । आम्ही कर्दलीवनांतुनी । प्रथमारंभी निघालो ॥१२॥

मग पाहिले कलकत्ता शहर । दुसरी नगरे देखिली अपूर्व । बंगालदेश समग्र । आम्ही असे पाहिला ॥१३॥

घेतले कालीचे दर्शन । पाहिले गंगातटाक पावन । नाना तीर्थे हिंडोन । हरिद्वाराप्रति गेलो ॥१४॥

पुढे पाहिले केदारेश्वर । हिंडलो तीर्थ समग्र । ऐंशी हजारो हजार । नगरे आम्ही देखिली ॥१५॥

मग तेथुनी सहज गती । पातलो गोदातटाकाप्रति । जियेची महाप्रख्याती । पुराणांतरी वर्णिली ॥१६॥

केले गोदावरीचे स्नान । स्थळे पाहिली परम पावन । काही दिवस फिरोन । हैदाराबादेसी पातलो ॥१७॥

येउनिया मंगळवेढ्यास । बहुत दिवस केला वास । मग येउनिया पंढरपुरास । स्वेच्छेने तेथे राहिलो ॥१८॥

तदनंतर बेगमपूर । पाहिले आम्ही सुंदर । रमले आमुचे अंतर । काही दिवस राहिलो ॥१९॥

तेथोनि स्वेच्छेने केवळ मग पाहिले मोहोळ । देश हिंडोनी सकळ । सोलापुरी पातलो ॥२०॥

तेथे आम्ही काही महिने । वास केला स्वेच्छेने । अक्कलकोटा - प्रति येणे । तेथोनिया जाहले ॥२१॥

तैपासूनि या नगरात । आनंदे आहो नांदत । ऐसे आमुचे सकल वृत्त । असे मूळापासोनि ॥२२॥

ऐकोनिया ऐशी वाणी । उभयता संतोषले मनी । मग स्वामी आज्ञा घेवोनी । गेले उठोनी उभयता ॥२३॥

द्वादश वर्षे मंगळवेढ्याप्रति । राहिले स्वामीराज यती । परी त्या स्थळी प्रख्याती । विशेष त्यांची न जाहली ॥२४॥

सदा वास अरण्यात । बहुधा न येती गावात । जरी आलिया क्वचित । गलिच्छ जागी बैसती ॥२५॥

कोणी काही आणोनि देती । तेचि महाराज भक्षिती । क्षणैक राहूनि मागुती । अरण्यात जाती उठोनी ॥२६॥

वेडा बुवा तयांप्रती । गावातील लोक म्हणती । कोणीही अज्ञाने नेणती । परब्रम्हरुप हे ॥२७॥

त्या समयी नामे दिगंबर । वृत्तीने केवळ जे शंकर । तेव्हा तयांचा अवतार । सोलापूरी जाहला ॥२८॥

ते जाणोनी अंतरखूण । स्वामींसी मानिती ईश्वरासमान । परी दुसरे अज्ञ जन । वेडा म्हणोनी लेखिती ॥२९॥

दर्शना येता दिगंबर । लीलाविग्रही यतिवर्य । कंबरेवरी ठेवूनी कर । दर्शन देती तयासी ॥३०॥

अमृतासमान पुढें कथा । ऐकता पावन श्रोता वक्ता । स्वामी समर्थ वदविता । ज्यांची सत्तासर्वत्र ॥३१॥

अहो हे स्वामी चरित्र । भरला असे क्षीरसागर । मुक्त करोनी श्रवणद्वार । प्राशन करा श्रोते हो ॥३२॥

तुम्हा नसावा येथे वीट । सर्वदा सेवावे आकंठ । भवभयाचे अरिष्ट । तेणे चुके विष्णू म्हणे ॥३३॥

स्वामी चरित्र सारामृत । नाना प्राकृत कथासंमत । आनंदे भक्त परिसोत । द्वितीयोऽध्याय गोड हा ॥३४॥

इति श्री स्वामी चरित्र सारामृते द्वितीयोऽध्यायः । श्रीरस्तु ॥ शुभमस्तु ॥

स्वामी समर्थांचा आशीर्वाद "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे"

# अध्याय ३

**॥ तिसरा अध्याय ॥**

श्री गणेशाय नमः ॥

धन्य धन्य ते या जगती । स्वामीचरणी ज्यांची भक्ती । त्यांसी नाही पुनरावृत्ती । पद पावती कैवल्य ॥१॥

गताध्यायी कथा सुंदर । स्वामींनी निवेदिले स्वचरित्र । आणि बाबा दिगंबर । त्यांचे वृत्त निवेदिले ॥२॥

निर्विकार स्वामीमूर्ति । लोका चमत्कार दाविती । काही वर्षे करोनी वस्ती । मंगळवेढे सोडिले ॥३॥

मोहोळमाजी वास्तव्य करीत । आप्पा टोळ झाले भक्त । तेथीचे साकल्य वृत्त । अल्पमती केवी वर्णू ॥४॥

स्वामी चरित्राचे हे सार । म्हणूनी केला नाहीं विस्तार । वर्णिता कथा समग्र । ग्रंथ पसरे उदधीसम् ॥५॥

सवे घेउनी स्वामींसी । टोळ जाती अक्कलकोटासी । अर्धमार्गावरुनी टोळांसी । मागे परतणे भाग पडे ॥६॥

टोळे आज्ञापिले सेवका जोवरी आम्ही येउ का । तोवरी स्वामींसी सोडू नका । येथेच मुक्काम करावा ॥७॥

टोळ गेलिया परतोनी । स्वामी चालले उठोनी । बहुत वर्जिले सेवकांनी । परी नच मानिले त्या ॥८॥

तेथोनिया निघाले । अक्कलकोटाप्रति आले । ग्रामद्वारी बैसले । यतिराज स्वेच्छेने ॥९॥

तेथे एक अविंध होता । तो करी तयांची थट्टा । परी काही चमत्कार पाहता । महासिद्ध समजला ॥१०॥

पूर्वपुण्यास्तव निश्चिती । आले चोळाप्पाचे गृहाप्रती । स्वामीसी जाणोनी ईश्वरमूर्ती । चोळाप्पा करी आदर ॥११॥

चोळाप्पाचे भाग्य उदेले । यतिराज गृहासी आले । जैसी कामधेनू आपण बळे । दारिद्र्याच्या घरी जाय ॥१२॥

पूर्वपुण्य होते गाठी । म्हणून घडल्या या गोष्टी । झाली स्वामीराज भेटी । परम भाग्य तयाचे ॥१३॥

धन्य धन्य तयाचे सदन । जे स्वामींचे वास्तव्यस्थान । सुरवरा जे दुर्लभ चरण । तयाच्या घरी लागले ॥१४॥

योगाभ्यासी योग साधिती । तडी तापडी मार्गी श्रमती । निराहार कितीक राहती । मौन धरिती किती एक ॥१५॥

एक चरणी उभे राहोन । सदा विलोकिती गगन । एक गिरिगव्हरी बैसोन । तपश्चर्या करिताती ॥१६॥

एक पंचाग्निसाधन करिती । एक पवनाते भक्षिती । कित्येक संन्यासी होती । संसार अवघा सांडोनी ॥१७॥

एक करिती कीर्तन । एक मांडिती पूजन । एक करिती होमहवन । एक षटकर्मे आचरिती ॥१८॥

एक लोका उपदेशिती । एक मांडिती पूजन । एक ब्राह्मण भोजन करिती । एक बांधिती देवालये ॥१९॥

परी जयाचे चरण । दुर्लभ सदभक्तीवाचोन । केलियासी नाना साधन । भावाविण सर्व व्यर्थ ॥२०॥

योगयागादिक काही । चोळापाने केले नाही । परी भक्तिस्तव पाही । स्वामी आले सदनाते ॥२१॥

तयाची देखोनिया भक्ती । स्वामी तेथे भोजन करिती । तेव्हा चोळाप्पाचे चित्ती । आनंद झाला बहुसाळ ॥२२॥

तैपासून तयाचे घरी । राहिले स्वामी अवतारी । दिवसैंदिवस चाकरी । चोळाप्पा करी अधिकाधिक ॥२३॥

तेव्हा राज्यपदाधिकारी । मालोजीराजे गादीवरी । दक्ष असोनि कारभारी परम ज्ञानी असती जे ॥२४॥

अक्कलकोटची प्रख्याती । तेव्हा काही विशेष नव्हती । परी तयांचे भाग्य निश्चिती । स्वामी चरणीं उदेलें ॥२५॥

तैपासून जगांत । त्या नगराचें नाव गाजत । अप्रसिद्ध ते प्रख्यात । कितीएक जाहले ॥२६॥

चोळाप्पाचे गृहाप्रती । आले कोणी एक यती । लोका चमत्कार दाविती । गावात मात पसरली ॥२७॥

आपुली व्हावी प्रख्याती । ऐसे नाही जयांचे चित्ती । म्हणूनिया स्वामीराज यती । बहुधा न जाती फिरावया ॥२८॥

लोकांमाजी पसरली मात । नृपासी कळला वृतांत । की आपुलिया नगरात । यती विख्यात पातले ॥२९॥

राहती चोळप्पाचे घरी । दर्शना जाती नरनारी । असती केवळ अवतारी । लीला ज्यांची विचित्र ॥३०॥

वार्ता ऐसी ऐकोनी । राव बोलले काय वाणी । गावात यती येवोनी । फार दिवस जाहले ॥३१॥

परी आम्हा श्रुत पाही । आजवरी जाहले नाही । आता जावोनी लवलाही । भेटू तया तयिवर्या ॥३२॥
परी ते केवळ अंतर्ज्ञानी । ऐसी वार्ता ऐकली कानी । हे सत्य तरी येवोनी । आताच देती दर्शना ॥३३॥
रावमुखातून वाणी निघाली । तोचि यतिमूर्ती पुढे ठेली । सकल सभा चकित झाली । मति गुंगली रायाची ॥३४॥
सिंहासनाखाली उतरोन । राव घाली लोटांगण । प्रेमाश्रुंनी भरले नयन । कंठ झाला सदगदित ॥३५॥
दृढ घातली मिठी चरणी । चरण धुतले नेत्राश्रूंनी । मग तयां हस्तकीं धरोनी । आसनावरी बैसविले ॥३६॥
खूण पटली अंतरी । स्वामी केवळ अवतारी । अभक्ती पळोनी गेली दूरी । चरणी भक्ती जडली तै ॥३७॥
सकळ सभा आनंदली । समस्ती पाऊले वदिली । षोडशोपचारे पूजिली । स्वामीमूर्ती नृपराये ॥३८॥
निराकार आणि निर्गुण । भक्तांसाठी झाले सगुण । तयांच्या पादुका शिरी धरोन । विष्णू नाचे ब्रम्हानंदे ॥३९॥
स्वामी चरित्र सारामृत । नाना प्राकृत कथा संमत । प्रेमळ भक्त परिसोत । तृतीयोऽध्याय गोड हा ॥४०॥
श्रीरस्तु ॥ शुभं भवतु ॥ इति श्रीस्वामीचरित्रसारामृत अक्कलकोटनगरप्रवेशे तृतीयोऽध्याय ॥

स्वामी समर्थांचा आशीर्वाद "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे"

## अध्याय ४

**|| चौथा अध्याय ||**

श्री गणेशाय नमः ॥ मुखें कीर्तन करावे । अथवा श्रवणी ऐकावे । षोडशोपचारे पूजावे । स्वामीचरण भक्तीने ॥१॥
नलगे करणे तीर्थाटन । योगाभ्यास होमहवन । सांडोनिया अवघा शीण । नामस्मरण करावे ॥२॥
स्वामी नामाचा जप करिता । चारी पुरुषार्थ येती हाता । स्वामीचरित्र गात ऐकता । पुनरावृत्ति चुकेल ॥३॥
गताध्यायाचे अंती । अक्कलकोटी आले यति । नृपराया दर्शन देती । स्वेच्छेने राहती तया पुरी ॥४॥
चोळाप्पाचा दृढ भाव । घरी राहिले स्वामीराव । हे तयाचे सुकृत पूर्व । नित्य सेवा घडे त्याते ॥५॥
जे केवळ वैकुंठवासी । अष्टसिद्धी ज्यांच्या दासी । नवनिधी तत्पर सेवेसी । ते धरिती मानवरुप ॥६॥
चोळाप्पा केवळ निर्धन । परी स्वामीकृपा होता पूर्ण । लक्ष्मी होऊनिया आपण । सहज आली तया घरी ॥७॥
कैसी आहे तयाची भक्ती । नित्य पाहती परीक्षा यति । नाना प्रकारे त्रास देती । परी तो कधी न कंटाळे ॥८॥
चोळाप्पाची सदगुणी कांता । तीही केवळ पतिव्रता । सदोदित तिच्या चित्ता । आनंद स्वामीसेवेचा ॥९॥
स्वामी नाना खेळ खेळती । विचित्र लीला दाखविती । नगरवासी जनांची भक्ती । दिवसेंदिवस दृढ जडली ॥१०॥
स्वामी केवळ ईश्वरमूर्ती । देशोदेशी झाली ख्याती । बहुत लोक दर्शना येती । कामना चित्ती धरोनी ॥११॥
कोणी संपत्तीकारणे । कोणी मागती संताने । व्हावी म्हणोनिया लग्ने । येती दूर देशाहूनी ॥१२॥
शरीरभोगें कष्टले । संसारतापे तप्त झाले । मायामय पसाऱ्याते फसले । ऐसे आले कितीएक ॥१३॥
सर्वांशी कल्पद्रुमासमान । होऊनी कामना करिती पूर्ण । भक्तकाजास्तव अवतीर्ण । मानवरुपे जाहले ॥१४॥
भक्त अंतरीं जे जे इच्छिती । ते ते यतिराज पुरविती । दृढ चरणी जयांची भक्ति । त्यासी होती कल्पतरु ॥१५॥
जे का निंदक कुटिल । तया शास्ते केवळ । नास्तिकाप्रती तात्काळ । योग्य शासन करिताती ॥१६॥
महिमा वाढला विशेष । कित्येक करु लागले द्वेष । कोणा एका समयास । वर्तमान घडले पै ॥१७॥
कोणी दोन संन्यासी । आले अक्कलकोटासी । हासोनि म्हणती जनांसी । ढोंगियाच्या नादी लागला ॥१८॥
हा स्वामी नव्हे ढोंगी । जो नाना भोग भोगी । साधू लक्षणे याचे अंगी । कोणते हो वसतसे ॥१९॥
काय तुम्हा वेड लागले । वंदिता ढोंग्याची पाऊले । यात स्वार्थ ना परमार्थ मिळे । फसला तुम्ही अवघेही ॥२०॥
ऐसे तयांनी निंदिले । समर्थांनी अंतरी जाणिले । जेव्हा ते भेटीसी आले । तेव्हा केले नवल एक ॥२१॥
पहावया आले लक्षण । समर्थं समजले ती खूण । ज्या घरी बैसले तेथोन । उठोनिया चालिले ॥२२॥
एका भक्ताचिया घरी । पातली समर्थांची स्वारी । तेही दोघे अविचारी । होते बरोबरी संन्यासी ॥२३॥
तेथे या तिन्ही मूर्ती । बैसविल्या भक्ते पाटावरती । श्री स्वामी आपुले चित्ती । चमत्कार म्हणती करु आता ॥२४॥
दर्शनेच्छू जन असंख्यात । पातले तेथे क्षणार्धात । समाज दाटला बहुत । एकच गर्दी जाहली ॥२५॥
दर्शन घेउन चरणांचे । मंगल नांव गर्जती वाचे । हेतू पुरवावे मनीचे । म्हणोनिया विनविती ॥२६॥
कोणी द्रव्य पुढे ठेविती । कोणी फळे समर्पिती । नाना वस्तू अर्पण करिती । नाही मिती तयांते ॥२७॥
कोणी नवसाते करिती । कोणी आणोनिया देती । कोणी काही संकल्प करिती । चरण पूजिती आनंदे ॥२८॥
संन्यासी कौतुक पाहती । मनामाजी आश्चर्य करिती । क्षण एक तटस्थ होती । वैरभाव विसरोनी ॥२९॥
क्षण एक घडता सत्संगती । तत्काळ पालटे की कुमति । म्हणोनी कवि वर्णिताती । संतमहिमा विशेष ॥३०॥
स्वामीपुढे जे जे पदार्थ । पडले होते असंख्यात । ते निजहस्ते समर्थ । संन्यासापुढे लोटिती ॥३१॥
पाणी सुटले त्यांच्या मुखासी । म्हणती यथेच्छ मिळेल खावयासी । आजा सारा दिवस उपवासी । जीव आमुचा कवळवला ॥३२॥

मोडली जनांची गर्दी । तो येवोनी सेवेकरी । संन्याशांपुढल्या नानापरी । वस्तू नेऊ लागले ॥३३॥
तेव्हा एका क्षणार्धात द्रव्यादिक सारे नेत । संन्यासी मनी झुरत । व्याकुळ होत भुकेने ॥३४॥
समर्थांनी त्या दिवशी । स्पर्श न केला अन्नोदकासी । सूर्य जाता अस्ताचळाची । तेथोनिया उठले ॥३५॥
दोघे सन्यासी त्या दिवशी । राहिले केवळ उपवासी । रात्र होता तयांसी । अन्नोदक वर्ज्य असे ॥३६॥
जे पातले करु छळणा । त्यांची जाहली विटंबना । दंडावया कुत्सित जना । अवतरले यतिवर्य ॥३७॥
त्यांच्या चरणी ज्यांची भक्ति । त्यांचे मनोरथ पुरविती । पसरली जगी ऐशी ख्याती । लीला ज्यांची विचित्र ॥३८॥
श्रीपादवल्लभ भक्ति । कलियुगीं वाढेल निश्चिती । त्यांचा अवतार स्वामी यति । वर्णि कीर्ती विष्णुदास ॥३९॥
श्रीस्वामीचरित्रसारामृत । नाना प्राकृत कथा संमत । सदा परिसोत प्रेमळ । भक्त चतुर्थोऽध्याय गोड हा ॥४०॥
श्रीस्वामीराजार्पणमस्तु ॥ श्रीरस्तु ॥ शुभं भवतु ॥

स्वामी समर्थांचा आशीर्वाद "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे"

## अध्याय ५

**|| पाचवा अध्याय ||**

श्री गणेशाय नमः ॥ भवकानन वैश्वानरा । अज्ञानतमच्छेदका भास्करा । पूर्णसाक्षी परात्परा । भक्ता खरा सदय तू ॥१॥
गंगाजळ जैसे निर्मळ । तैसे तुझे मन कोमल । तुजसी स्तविता प्रेमळ । सत्वर त्याते पावसी ॥२॥
विशेष गंगाजळाहून । आपुले असे महिमान । पाप ताप आणि दैन्य । तुमच्या स्मरणे निवारती ॥३॥
स्वामीचरित्र कराया श्रवण । श्रोते बैसले सावधान । प्रसंगाहूनि प्रसंग पूर्ण । रसभरित पुढे पुढे ॥४॥
ज्यांचे सबळ पूर्वपुण्य । तया झाले स्वामी दर्शन । ऐसे चोळाप्पा आदीकरुन । भाग्यवंत सेवेकरी ॥५॥
अक्कलकोट नगरात । एक तपपर्यंत । स्वामीराज वास करीत । भक्त बहुत जाहले ॥६॥
वार्ता पसरली चहूकडे । कोणासी पडता साकडे । धाव घेती स्वामींकडे । राजेराजवाडे थोर थोर ॥७॥
म्हणती भोसल्यांचे भाग्य परम । स्वामीरत्न लाधले उत्तम । नृपतीही भक्त निस्सीम । स्वामी चरणी चित्त त्यांचे ॥८॥
तेव्हा कितीएक नृपती । स्वामीदर्शन घेऊ इच्छिती । आणि आपुल्या नगराप्रती । आणू म्हणती तयांसी ॥९॥
अक्कलकोटाहूनी स्वामीसी । आणावे आपुल्या नगरासी । मग कोणे एके दिवशी । सभेमाजी बैसले ॥११॥
दिवाण आणि सरदार । मानकरी तैसे थोर थोर । बैसले असता समग्र । बोले नृपवर तयांप्रती ॥१२॥
कोणी जाऊनी अक्कलकोटासी । येथे आणील स्वामीसी । तरी आम्ही तयासी । इनाम देऊ बहुत ॥१३॥
त्याचा राखू सन्मान । लागेल तितुके देऊ धन । ही वटपुरी वैकुंठभवन । वसता स्वामी होईल ॥१४॥
कार्य जाणूनीकठीण । कोणी न बोलती वचन । कोणा एका लागून । गोष्ट मान्य करवेना ॥१५॥
तेव्हा तात्यासाहेब सरदार । होता योग्य आणि चतुर । तो बोलता झाला उत्तर । नृपलागी परियेसा ॥१६॥
आपुली जरी इच्छा ऐसी । स्वामीते आणावे वटपुरीसी । तरी मी आणीन तयांसी । निश्चय मानसी असो द्या ॥१७॥
ऐसे ऐकोनी उत्तर । संतोषला तो नृपवर । तैसी सभाही समग्र । आनंदित जाहली ॥१८॥
संजिवनी विद्या साधण्याकरीता । शुक्राजवळी कच जाता । देवी सन्मानिला होता । बहुत आनंदे करोनी ॥१९॥
नृपतीसह सकळ जने । त्यावरी तात्यासी सन्माने । गौरवोनि मधुर वचने । यशस्वी हो म्हणती तया ॥२०॥
बहुत धन देत नृपती । सेवक दिधले सांगाती । जावया अक्कलोटाप्रती । आज्ञा दिली तात्याते ॥२१॥
तात्यासाहेब निघाले । सत्वर अक्कलकोटी आले । नगर पाहूनी संतोषले । जे केवळ वैकुंठ ॥२२॥
पाहुनी स्वामीची दिव्य मूर्ती । आनंद झाले चित्ती । तेथील जनांची पाहुनी भक्ती । धन्य म्हणती तयाते ॥२३॥
अक्कलकोटीचे नृपती । स्वामीचरणी त्यांची भक्ती । राजघराण्यातील युवती । त्याही करिती स्वामीसेवा ॥२४॥
आणि सर्व नागरिक । तेही झाले स्वामीसेवक । त्यांत वरिष्ठ चोळाप्पादिक । सेवेकरी निस्सीम ॥२५॥
ऐसे पाहूनी तात्यांसी । विचार पडला मानसी । या नगरातुनी स्वामींसी । कैसे नेऊ आपण ॥२६॥
अक्कलकोटीचे सकल जन । स्वामीभक्त झाले पूर्ण । स्वामींचेही मन रमोन । गेले ऐसे ह्या ठाया ॥२७॥
प्रयत्नांती परमेश्वर । प्रयत्ने कार्य होय सत्वर । लढवोनी युक्ती थोर । कार्य आपण साधावे ॥२८॥
ऐसा मनी विचार करोनी । कार्य आरंभिले तात्यांनी । संतुष्ट रहावे सेवकजनी । ऐसे सदा करिताती ॥२९॥
करोनी नाना  पक्वान्ने । करिती ब्राह्मणभोजने । दिधली बहुसाल दाने । याचक धने तृप्त केले ॥३०॥
स्वामीचिया पूजेप्रती । नाना द्रव्ये समर्पिती । जेणे सेवेकरी संतुष्ट होती । ऐसे करीती सर्वदा ॥३१॥
प्रसन्न व्हावे भक्तवत्सले । कार्य साधावे आपुले । म्हणोनी नाना उपाय केले । द्रव्य वेचिले तात्यांनी ॥३२॥
ऐशीयाने काही न झाले । केले तितुके व्यर्थ गेले । तात्या मनी खिन्न झाले । विचार पडला तयांसी ॥३३॥

मग लढविली एक युक्ती । एकांती गाठूनी चोळाप्पाप्रती । त्याजलागी विनंती करिती । बुद्धिवाद सांगती त्या ॥३४॥
जरी तुम्ही समर्थांसी । घेऊनी याल बडोद्यासी । मग मल्हारराव आदरेसी । इनाम देतील तुम्हाते ॥३५॥
मान राहील दरबारी । आणि देतील जहागिरी । ऐसे नानाप्रकारी । चोळाप्पाते सांगितले ॥३६॥
द्रव्येण सर्वे वशाः । चोळाप्पासी लागली आशा । तयाच्या अंतरी भरवसा । जहागिरीचा बहुसाल ॥३७॥
मग कोणे एके दिवशी । करीत असता स्वामीसेवेसी । यतिराज तया समयासी । आनंदवृत्ती बैसले ॥३८॥
चोळाप्पाने कर जोडोनी । विनंती केली मधुर वचनी । कृपाळू होऊनी समर्थांनी । बडोद्याप्रती चलावे ॥३९॥
तेणे माझे कल्याण । मिळेल मला बहुत धन । आपुलाही योग्य सन्मान । तेथे जाता होईल ॥४०॥
ऐसे ऐकोनिया वचन । समर्थांनी हास्य करोन । उत्तर चोळाप्पालागोन । काय दिले सत्वर ॥४१॥
रावमल्हार नृपती । त्याच्या अंतरी नाही भक्ती । मग आम्ही बडोद्याप्रती । काय म्हणोनी चलावे ॥४२॥
पुढले अध्यायी सुंदर कथा । पावन होय श्रोता वक्ता । श्रीस्वामीराज वदविता । निमित्त विष्णुदास असे ॥४३॥
इति श्रीस्वामीचरित्रसारामृत । नाना प्राकृत कथा संमत । सदा ऐकोत भाविक भक्त । पंचमोऽध्याय गोड हा ॥४४॥
श्रीरस्तुः शुभं भवतु ॥

स्वामी समर्थांचा आशीर्वाद "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे"

## अध्याय ६

**|| सहावा अध्याय ||**

श्री गणेशाय नमः ॥ धरोनी शिशूचा हात । अक्षरे पंडित लिहवीत । तैसे स्वामीचरित्रामृत । स्वामी समर्थ वदविती ॥१॥
मी केवळ मतिमंद । केवी वर्णू चरित्र अगाध । परी माझा हा छंद । स्वामी समर्थ पुरविती ॥२॥
ज्यांच्या वरप्रसादे करुन । मुढा होय शास्त्रज्ञान । त्या समर्थांचे चरण । वारवार नमितसे ॥३॥
कृपाळू होऊन समर्थ । वदवावे आपुल्या चरिता । श्रवणे श्रोतयांच्या चित्ता । ब्रह्मानंद प्राप्त होवो ॥४॥
सुरतरुची घेऊनी सुमने । त्यासीच अर्पावी प्रीतीने । झाला ग्रंथ स्वामी कृपेने । त्यांच्याच पदी अर्पिजे ॥५॥
मागील अध्यायाच्या अंती । चोळाप्पा विनवी स्वामीप्रती । कृपा करोनी मजवरती । बडोद्यासी चलावे ॥६॥
भाषण ऐसे ऐकोनी । समर्थ बोलती हांसोनी । मल्हाररावाचिया मनी । आम्हांविषयी भाव नसे ॥७॥
म्हणोनी तयाच्या नगरात । आम्हा जाणे नव्हे उचित । अक्कलकोट नगरात । आम्हा राहणे आवडे ॥८॥
ऐसी ऐकोनिया वाणी । चोळाप्पा खिन्न झाला मनी । त्याने सत्वर येवोनी । तात्याप्रती सांगितले ॥९॥
ऐसा यत्न व्यर्थ गेला । तात्या मनी चिंतावला । आपण आलो ज्या कार्याला । ते न जाय सिद्धीसी ॥१०॥
परी पहावी यत्न करोनी । ऐसा विचार केला मनी । मग काय केले तात्यांनी । अनुष्ठान आरंभिले ॥११॥
ऐसे नाना उपाय केले । परी ते सर्व व्यर्थ गेले । कार्य सिद्धिस न गेले । खिन्न झाले मुख त्यांचे ॥१२॥
भक्ती नाही अंतरी । दांभिक साधनाते करी । तयांते स्वामी नरहरी । प्रसन्न कैसे होतील ॥१३॥
तयांनी माजविली ढोंगे । आणि केली नाना सोंगे । भक्तीविण हठयोगे । स्वामी कृपा न होय ॥१४॥
मग तात्यांनी काय केले । सप्ताहासी ब्राह्मण बैसविले । गुरुचरित्र आरंभिले । व्हावयासी स्वामीकृपा ॥१५॥
परी तयाच्या वाड्यात । कधी न गेले समर्थ । तात्या झाला व्यग्रचित्त । काही उपाय सुचेना ॥१६॥
मल्हारराव नृपाने । पाठविले ज्या कार्याकारणे । ते आपल्या हातून होणे । अशक्य असे वाटते ॥१७॥
आता जाऊनी बडोद्यासी । काय सांगावे राजियासी । आणि सकळ जनांसी । तोंड कैसे दाखवावे ॥१८॥
ऐशा उपाये करोन । न होती स्वामी प्रसन्न । आता एक युक्ती योजुन । न्यावे पळवोन यतीसी ॥१९॥
स्वामी केवळ ईश्वरमूर्ती । हे नेणे तो मंदमती । म्हणूनी योजिली कपटयुक्ती । परी ते सिद्धीते न जाय ॥२०॥
असो कोणे एके दिवशी । साधोनी योग्य समायासी । मेण्यात घालोनी स्वामीसी । तात्यासाहेब निघाले ॥२१॥
कडपगांवचा मार्ग धरिला । अर्धमार्गी मेणा आला । अंतरसाक्षी समर्थाला । गोष्ट विदित जाहली ॥२२॥
मेण्यातूनी उतरले । मागुती अक्कलकोटी आले । ऐसे बहुत वेळा घडले । हाही उपाय खुंटला ॥२३॥
मग पुढे राजवाड्यात । जाऊनिया राहिले समर्थ । तेव्हा उपाय खुंटत । टेकिले हात तात्यांनी ॥२४॥
या प्रकारे यत्न केले । परी तितुके व्यर्थ गेले । व्यर्थ दिवस गमाविले । द्रव्य खर्चिले व्यर्थची ॥२५॥
मग अपयशाते घेवोनी । बडोद्यासी आले परतोनी । समर्थकृपा भक्तीवाचोनी । अन्य उपाय न होय ॥२६॥
परी मल्हारसव नृपती । प्रयत्न आरंभीती पुढती । सर्वत्रांसी विचारिती । कोण जातो स्वामींकडे ॥२७॥
तेव्हा मराठा उमराव । यशवंत तयांचे नाव । नृपकार्याची धरुन हाव । आपण पुढे जाहला ॥२८॥
स्वामीकारणे वस्त्रे भूषणे । धन आणि अमोल रत्ने । देऊनी त्याजवळी नृपाने । आज्ञा दिधली जावया ॥२९॥
तो येवोनि अक्कलकोटी । घेतली समर्थांची भेटी । वस्त्रे अलंकार सुवर्णताटी । स्वामीपुढे ठेवित ॥३०॥
ती पाहूनी समर्थाला । तेव्हा अनिवार क्रोध आला । यशवंता पाहोनी डोळा । काय तेव्हा बोलले ॥३१॥
अरे बेडी आणोनी । सत्वर ठोका याचे चरणी । ऐसे त्रिवार मोठ्यांनी । समर्थ क्रोधे बोलले ॥३२॥

क्रोध मुद्रा पाहोनी । यशवंतराव भ्याला मनी । पळाले तोंडचे पाणी । लटलटा कापू लागला ॥३३॥
मग थोड्याच दिवशी । आज्ञा आली यशवंतासी । सत्वर यावे बडोद्यासी । तेथील कार्यासी सोडोनी ॥३४॥
साहेबा विषप्रयोग केला । मल्हाररावावरी आळ आला । त्या कृत्यामाजी यशवंताला । गुन्हेगार लेखिले ॥३५॥
हाती पायी बेडी पडली । स्वामीवचनाची प्रचिती आली । अघटित लीला दाविली । ख्याती झाली सर्वत्र ॥३६॥
समर्थांची अवकृपा जयावरी । त्याच्या कष्ट होती शरीरी । कृपा होय ज्यावरी । तया सर्वानंद प्राप्त होय ॥३७॥
महासमर्था भक्त पालका । अनादिसिद्धा जगन्नायका । निशिदिनी शंकर सखा । विष्णूचिया मनी वसे ॥३८॥
इति श्रीस्वामीचरित्रसारामृत । नाना प्राकृत कथा संमत । सदा भक्त परिसोत । षष्ठोऽध्यायः गोड हा ॥३९॥
इति श्रीस्वामीचरित्रसारामृते षष्ठोऽध्याय ॥ शुभं भवतु ॥

स्वामी समर्थांचा आशीर्वाद "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे."

## अध्याय ७

**|| सातवा अध्याय ||**

श्री गणेशाय नमः ॥ जयजयाजी निर्गुणा । जयजयाजी सनातना । जयजयाजी अघहरणा । लोकपाला सर्वेशा ॥१॥
आपुल्या कृपेकरोन । अल्प वर्णिले आपले गुण । श्रोती द्यावे अवधान । श्रवणी आदर धरावा ॥२॥
अक्कलकोटी मालोजी नृपती । समर्थचरणी जयाची भक्ति । स्वहस्ते सेवा नित्य करोनि । करिती यती परब्रह्मा ॥३॥
वेदांत आवडे तयासी । श्रवण करिती दिवसनिशी । हेरळीकरादिक शास्त्रासी । वेतने देऊनि ठेविले ॥४॥
त्या समयी मुंबापुरी । विष्णुबुवा ब्रह्मचारी । प्राकृत भाषणे वेदांतावरी । करुनी लोका उपदेशिती ॥५॥
कैकांचे भ्रम दवडिले । परधर्मोपदेशका जिंकिले । कुमार्गवर्तियासी आणिले । सन्मार्गावरी तयानी ॥६॥
त्यासी आणावे अक्कलकोटी । हेतु उपजला नृपापोटी । बहुत करोनी खटपटी । बुवांसी शेवटी आणिले ॥७॥
नृपा आवडे वेदांत । बुवा त्यात पारंगत । भाषणे श्रोतयाचे चित्त । आकर्षूनि घेती ते ॥८॥
रात्रंदिन नृपमंदिरी । वेदांतचर्चा ब्रह्माचारी । करिती तेणे अंतरी । नृपती बहुत सुखावे ॥९॥
अमुतानुभवदि ग्रंथ । आणि ज्ञानेश्वरी विख्यात । कित्येक संस्कृत प्राकृत । वेदात ग्रंथ होते जे ॥१०॥
त्याचे करोनी विवरण । संतोषित केले सर्व जन । तया नगरी सन्मान । बहुत पावले ब्रह्माचारी ॥११॥
ख्याती वाढली लोकांत । स्तुति करिती जन समस्त । सदा चर्चा वेदात । राजगृही होतसे ॥१२॥
जे भक्त जनांचे माहेर । प्रत्यक्ष दत्ताचा अवतार । ते समर्थ यतीश्वर । अक्कलकोटी नांदती ॥१३॥
एके दिवशी सहज स्थिती । ब्रह्माचारी दर्शना येती । श्रेष्ठ जन सांगती । कित्येक होते तया वेळी ॥१४॥
पहावया यतीचे लक्षण । ब्रह्माचारी करिती भाषण । काही वेदांतविषय काढून । प्रश्न करिती स्वामीसी ॥१५॥
ब्रह्मपद तदाकार । काय केल्याने होय निर्धार । ऐसे ऐकोनि सत्वर । यतिराज हासले ॥१६॥
मुखे काही न बोलती । वारंवार हास्य करिती । पाहूनी ऐशी विचित्र वृत्ति । बुवा म्हणती काय मनी ॥१७॥
हा तो वेडा संन्यासी । भुरळ पडली लोकांसी । लागले व्यर्थ भक्तीसी । याने ढोंग माजविले ॥१८॥
तेथोनि निघाले ब्रह्मचारी । आले सत्वर बाहेरी । लोका बोलती हास्योत्तरी । तुम्ही व्यर्थ फसला हो ॥१९॥
परमेश्वररुप म्हणता यती । आणि करिता त्याची भक्ति । परी हा भ्रम तुम्हाप्रती । पडला असे सत्यची ॥२०॥
पाहोनि तुमचे अज्ञान । याचे वाढले ढोंग पूर्ण । वेदशास्त्रादिक ज्ञान । याते काही असेना ॥२१॥
ऐसे ब्रह्मचारी बोलोनी । पातले आपुल्या स्वस्थानी । विकल्प पातला मनीं । स्वामीसी तुच्छ मानिती ॥२२॥
नित्यनियम सारोन । ब्रह्मचारी करिती शयन । जवळी पारशी दोघेजण । तेही निद्रिस्थ जाहले ॥२३॥
निद्रा लागली बुवांसी । लोटली कांही निशी । एक स्वप्न तयांसी । चमत्कारिक पडलेसे ॥२४॥
आपुल्या अंगावरी वृश्चिक । एकाएकी चढले असंख्य । महाविषारी त्यातुनी एक । दंश आपणा करीतसे ॥२५॥
ऐसे पाहोनी ब्रह्मचारी । खडबडोनी उठले लौकरी । बोबडी पडली वैखरी । शब्द एक ना बोलवे ॥२६॥
जवळी होते जे पारशी । जागृती आली तयांसी । त्यांनी धरोनी बुवांसी । सावध केले त्या वेळी ॥२७॥
ह्रदय धडाधड उडू लागले । घर्मे शरीर झाले ओले । तेव्हा पारशांनी पुसले । काय झाले म्हणोनी ॥२८॥
मग स्वप्नीचा वृत्तांत । तयासी सांगती समस्त । म्हणती यात काय अर्थ । ऐसी स्वप्ने कैक पडती ॥२९॥
असो दुसऱ्या दिवशी । बुवा आले स्वामीपाशी । पुसता मागील प्रश्नासी । खदखदा स्वामी हासले ॥३०॥
मग काय बोलती यतीश्वर । ब्रह्मापद तदाकार । होण्याविषयी अंतर । तुझे जरी इच्छितसे ॥३१॥
तरी स्वप्नी देखोनी वृश्चिकांसी । काय म्हणोनी भ्यालासी । जरी वृथा भय मानितोसी । मग ब्रह्मापद जाणसी कैसे ॥३२॥

ब्रह्मापद तदाकार होणे । हे नव्हे सोपे बोलणे । यासी लागती कष्ट करणे । फुकट हाता न येचि ॥३३॥
बुवांप्रती पटली खूण । धरिले तत्काळ स्वामीचरण । प्रेमाश्रूंनी भरले नयन । कंठ झाला सदगदित ॥३४॥
तया समयापासोनी । भक्ती जडली स्वामीचरणी । अहंकार गेला गळोनी । ब्रह्मापद योग्य झाले ॥३५॥
स्वामीचरित्र महासागर । त्यातूनी मुक्ते निवडूनि सुंदर । त्याचा करोनिया हार । अर्पी शंकर विष्णुकवी ॥३६॥
इति श्रीस्वामीचरित्रसारामृत । नाना प्राकृत कथा समत । सदा परिसोत भाविक भक्त । सप्तमोऽध्याय गोड हा ॥३७॥
श्रीराजाधिराज योगिराज श्री स्वामी समर्थार्पणमस्तु ॥

स्वामी समर्थांचा आशीर्वाद "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे."

## अध्याय ८

**|| आठवा अध्याय ||**

श्री गणेशाय नमः ॥ जयजयाजी सुखधामा । जयजयाजी परब्रह्मा । जयजय भक्तजन विश्रामा । अनंतवेषा अनंता ॥१॥
तुझ्याच कृपे निश्चित । अल्प वर्णिले स्वामीचरित । पुढे कथा सुरस अत्यंत । वदविता तू दयाळ ॥२॥
मागील अध्यायाचे अंती । विष्णुबुवा ब्रह्मचाऱ्यांप्रती । चमत्कार दाविती यती । ते चरित्र वर्णिले ॥३॥
अक्कलकोटी वास केला । जन लाविले भजनाला । आनंद होतसे सकला । वैकुंठासम नगरी ते ॥४॥
राजे निजाम सरकार । त्यांचे पदरी दस्तरदार । राजे रायबहाद्दूर । शंकरराव नामक ॥५॥
सहा लक्षांची जहागीर त्याप्रती । सकल सुखे अनुकूल असती । विपुल संपत्ति संतती । काही कमती असेना ॥६॥
परी पूर्वकर्म अगाध । तया लागला ब्रह्मासमंध । उपाय केले नानाविध । परी बाधा न सोडी ॥७॥
समंधबाधा म्हणोन । चैन न पडे रात्रंदिन । गेले शरीर सुकोन । गोड न लागे अन्नपाणी ॥८॥
नावडे भोगविलास । सुखोपभोग कैचा त्यास । निद्रा न येचि रात्रंदिवस । चिंतानले पोळले ॥९॥
केली कित्येक अनुष्ठाने । तैशीच ब्राह्मण संतर्पणे । बहुसाल दिधली दाने । आरोग्य व्हावे म्हणोनी ॥१०॥
विटले संसारसौख्यासी । त्रासले या भवयात्रेसी । कृष्णवर्ण आला शरीरासी । रात्रंदिन चैन नसे ॥११॥
विधीने लेख भाळी लिहिला । तो न चुके कवणाला । तदनुसार प्राणिमात्राला । भोगणे प्राप्त असे की ॥१२॥
कोणालागी जावे शरण । मजवरी कृपा करील कोण । सोडवील व्याधीपासोन । ऐसा कोण समर्थ ॥१३॥
मग केला एक विचार । प्रसिद्ध क्षेत्र श्रीगाणगापूर । तेथे जाऊनि अहोरात्र । दत्तसेवा करावी ॥१४॥
ऐसा विचार करोनी । तात्काळ आले त्या स्थानी । स्वतः बैसले अनुष्ठानी । व्याधी दूर व्हावया ॥१५॥
सेवा केली बहुवस । ऐसे लोटले तीन मास । एके रात्री तयास । स्वप्नी दृष्टांत जाहला ॥१६॥
अक्कलकोटी जावे तुवा । तेथे करावी स्वामीसेवा । यतिवचनी भाव धरावा । तेणे व्याधी जाय दूरी ॥१७॥
शंकररावांची भक्ती । स्वामीचरणी काही नव्हती । म्हणोनी दृष्टांतावरती । गाणगापूर न सोडिले ॥१८॥
ते तेथेचि राहिले । आणखी अनुष्ठान आरंभिले । पुन्हा तयांसी स्वप्नी पडले । अक्कलकोटी जावे त्वा ॥१९॥
हे जाणोनि हितगोष्टी । मानसी विचारुनी शेवटी । त्वरित आले अक्कलकोटी । प्रियपत्नीसहित ॥२०॥
अक्कलकोट नगरात । शंक्रराव प्रवेशत । तो देखिले जन समस्त । प्रेमळ भक्त स्वामीचे ॥२१॥
स्वामीनाम वदती वाचे । कीर्तन स्वामीचरित्राचे । पूजन स्वामीचरणांचे । आराध्यदैवत स्वामीच ।\२२॥
तया नगरीच्या नरनारी । कामधंदा करिता घरी । स्वामीचरित्र परस्परी । प्रेमभावे सांगती ॥२३॥
कित्येक प्रातः स्नाने करोनी । पूजाद्रव्य घेवोनी । अर्पावया समर्थचरणी । जाती अति त्वरेने ॥२४॥
महाराष्ट्र भाषा उद्यान । पद्मकुसुमे निवडोन । शंकर विष्णू दोघेजण । स्वामीचरण पुजिती ॥२५॥
श्री स्वामीचरणारविंदार्पणमस्तु ॥ इतिश्रीस्वामीचरित्रसारामृते अष्टमोऽध्याय ॥ श्रीरस्तु ॥

स्वामी समर्थांचा आशीर्वाद "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे."

## अध्याय ९

**|| नववा अध्याय ||**

श्री गणेशाय नमः ॥ घरोघरी स्वामीकीर्तने । नित्य होती ब्राह्मण - भोजने । स्वामीनामाची जप ध्याने अखंडित चालती ॥१॥
दिगंतरी गाजली ख्याती । कामना धरोनी चित्ती । बहुत लोक दर्शना येती । अक्कलकोट नगरात ॥२॥
ब्राह्मण क्षत्रिय वैश्यादिक । शूद्र आणि अनामिक । पारसी यवन भाविक । दर्शना येती धावोनी ॥३॥
यात्रेची गर्दी भारी । सदा आनंदमय नगरी । साधु संत ब्रह्मचारी । फकीर संन्यासी येती पै ॥४॥
किती वर्णावे महिमान । जेथे अवतरले परब्रह्म । ते नगरी वैकुंठधाम । प्रत्यक्ष भासू लागली ॥५॥
असो ऐशा नगरात । शंकरराव प्रवेशत । आनंदमय झाले चित्त । समाधान वाटले ॥६॥
यात्रेची झाली दाटी । कैशी होईल स्वामीभेटी । हे चिंता उपजली पोटी । मग उपाय योजिला ॥७॥
जे होते स्वामीसेवक । त्यात सुंदराबाई मुख्य । स्वामीसेवा सकळिक । तिच्या हस्ते होतसे ॥८॥
तियेची घेऊनी गाठी । शंकरराव सांगती गोष्टी । करोनी द्याल स्वामी भेटी । तरी उपकार होतील ॥९॥
व्याधी दूर करावी म्हणोनी । विनंती करला स्वामीचरणी । तरी आपणा लागोनी । द्रव्य काही देईन ॥१०॥
बाईसी द्रव्यलोभ पूर्ण । आनंदले तियेचे मन । म्हणे मी इतुके करीन । दोन सहस्त्र रुपये द्याल की ॥११॥
ते म्हणती बाईसी । इतुके कार्य जरी करिती । तरी दहा सहस्त्र रुपयांसी । देईन सत्य वचन हे ॥१२॥
बाई विस्मित झाली अंतरीं । ती म्हणे हे सत्य जरी । तरी उदक घेऊनी करी । संकल्प आपण सोडावा ॥१३॥
शंकरराव तैसे करिती । बाई आनंदली चित्ती । म्हणे मी प्रार्थुनिया स्वामीप्रती । कार्य आपुले करीन ॥१४॥
मग एके दिवशी यती । बैसले होते आनंदवृत्ति । शंकरराव दर्शन. घेती । भाव चित्ती विशेष ॥१५॥
बाई स्वामींसी बोले वचन । हे गृहस्थ थोर कुलीन । परी पूर्वकर्मे यालागून । ब्रह्मसमंध पीडिती ॥१६॥
तरी आता कृपा करोनी । मुक्त करावे व्याधीपासोनी । ऐसे ऐकता वरदानी । समर्थ तेथोनी उठले ॥१७॥
चालले गावाबाहेरी । आले शेखनुराचे दर्ग्यावरी । शंकररावही बरोबरी । त्या स्थळी पातले ॥१८॥
यवनस्मशानभूमीत । आले यतिराज त्वरित । एका नूतन खाचेत । निजे छाटी टाकोनी ॥१९॥
सेवेकरी शंकररावासी । म्हणती लीला करुन ऐसी । चुकविले तुमच्या मरणासी । निश्चय मानसी धरावा ॥२०॥
काही वेळ गेल्यावरी । उठली समर्थांची स्वारी । शेखनुराचे दर्ग्यावरी । येऊनी पुढे चालले ॥२१॥
शंकरावे तया दिवशी । खाना दिधला फकिरासी । आणि शेखनूर दर्ग्यासी । एक कफनी चढविली ॥२२॥
मग काही दिवस लोटत । स्वामीराज आज्ञापित । बारीक वाटूनी निंबपत्र । दहा मिरे त्यात घालावी ॥२३॥
ते घ्यावे हो औषध । तेणे जाईल ब्रह्मासमंध । जाहला स्वामीराज वैद्य । व्याधी पळे आपणची ॥२४॥
स्वामीवचनी धरुनी भाव । औषध घेती शंकरराव । तयासी आला अनुभव । दहा दिवस लोटले ॥२५॥
प्रकृतीची आराम पडला । राव गेले स्वनगराला । काही मास लोटता तयाला । ब्रह्मसंमधे सोडिले ॥२६॥
मग पुन्हा आनंदेसी । दर्शना आले अक्कलकोटासी । घेऊनी स्वामीदर्शनासी । आनंदित जाहले ॥२७॥
म्हणती व्याधी गेल्यानंतर । रुपये देईन दहा सहस्त्र । ऐसा केला निर्धार । त्याचे काय करावे ॥२८॥
महाराज आज्ञापिती । गावाबाहेर आहे मारुती । तेथे चुनेगच्ची निश्चिती । मठ तुम्ही बांधावा ॥२९॥
ऐशिया एकांत स्थानी । राहणार नाही कोणी । ऐसी विनंती स्वामीचरणी । कारभारी करिताती ॥३०॥
परि पुन्हा आज्ञा झाली । मठ बांधिला चुनेगच्ची । कीर्ती शंकररावाची । अजरामर राहिली ॥३२॥
अगाध स्वामीचरित्र । तयाचा न लगेची पार । परी गंगोदक पवित्र । अल्प सेविता दोष जाती ॥३३॥
श्रवणी धरावा आदर । तेणे साधती इहपरत्र । जे झाले स्वामीकिंकर । विष्णू शंकर वदिती त्या ॥३४॥
श्री स्वामीसमर्थचरित्रसारामृत । नाना प्राकृत कथा संमत । सदा परिसोत भाविक भक्त । नवमोऽध्याय गोड हा ॥३५॥
॥ श्री स्वामीराजार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥ श्रीरस्तु ॥

स्वामी समर्थांचा आशीर्वाद "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे."

## अध्याय १०

**॥ दहावा अध्याय ॥**

श्री गणेशाय नमः ॥ गाठी होते पूर्वपूण्य । म्हणूनी पावलो नरजन्म । याचे सार्थक उत्तम । करणे उचित आपणा ॥१॥
ऐसा मनी करुनी विचार । आरंभिले स्वामीचरित्र । ते शेवटासी नेणार । स्वामी समर्थ असती पै ॥२॥
हावेरी नाम ग्रामी । यजुर्वेदी गृहस्थाश्रमी । बाळाप्पा नामे द्विज कोणी । राहत होते आनंदे ॥३॥
संपत्ति आणि संतती । अनुकूल सर्व तयांप्रती । सावकारी सराफी करिती । जनी वागती प्रतिष्ठित ॥४॥
तीस वर्षांचे वय झाले । संसाराते उबगले । सदगुरुसेवेचे दिवस असाले । मती पालटली तयांची ॥५॥
लटिका अवघा संसार । यामाजी नाही सार । परलोकी दारा पुत्र । कोणी नये कामाते ॥६॥
इहलोकी जे जे करावे । परलोकी त्याचे फळ भोगावे । दुष्कर्माने दुःख भोगावे सत्कर्मे सौख्य पाविजे ॥७॥
बाळाप्पाचे मनात । यापरी विचार येत । सदा उद्विग्न चित्त । व्यवहारी सौख्या वाटेना ॥८॥
जरी संसारी वर्तती । तरी मनी नाही शांती । योग्य सदगुरु आपणाप्रती । कोठे आता भेटेल ॥९॥
हाचि विचार रात्रंदिन । चित्ताचे न होय समाधान । तयांप्रती सुस्वप्न । तीन रात्री एक पडे ॥१०॥
पंचपक्कान्ने सुवर्ण ताटी । भरोनी आपणापुढे येती । पाहोनिया ऐशा गोष्टी । उल्हासले मानस ॥११॥
तात्काळ केला निर्धार । सोडावे सर्व घरदार । मायापाश दृढतर । विवेकशस्त्रे तोडावा ॥१२॥
सोलापुरी काम आम्हांसी । ऐसे सांगूनी सर्वत्रांसी । निघाले सदगुरु शोधासी । घरदार सोडिले ॥१३॥
मुरगोड ग्राम प्रख्यात । तेथे आले फिरत फिरत । जेथे चिदंबर दीक्षित । महापुरुष जन्मले ॥१४॥
ते ईश्वरी अवतार । लोकां दाविले चमत्कार । तयांचा महिमा अपार । वर्णू केवी अल्प मती ॥१५॥
स्वामीचरित्र वर्णितां । चिदंबर दीक्षितांची कथा । आठवली ते वर्णिता । सर्व दोष हरतील ॥१६॥
महायात्रा संकल्पेकरुन । जन निघती घराहून । परी मार्गी लागल्या । पुण्यस्थान, स्नानदान करिताती ॥१७॥
महायात्रा स्वामीचरित्र । ग्रंथ क्रमिता मी किंकर । मार्गी लागले अति पवित्र । चिदंबर पुण्यस्थान ॥१८॥
तयांचे घेऊनी दर्शन । पुढे करावे मार्गक्रमण । श्रोती होउनी सावधान । श्रवणी सादर असावे ॥१९॥
मुरगोडी मल्हार दीक्षित । वेदशास्त्री पारंगत । धर्मकर्मी सदारत । ईश्वरभक्त तैसाची ॥२०॥
जयांची ख्याती सर्वत्र । विद्याधनाचे माहेर । अलिप्तपणे संसार । करोनी काळ क्रमिताती ॥२१॥
परी तया नाही संतती । म्हणोनिया उद्विग्न चित्ती । मग शिवाराधना करिती । कामना चित्ती धरोनी ॥२२॥
द्वादश वर्षे अनुष्ठान । केले शंकराचें पूजन । सदाशिव प्रसन्न होऊन । वर देत तयांसी ॥२३॥
तुझी भक्ती पाहोन । संतुष्ट झाले माझे मन । मीच तुझा पुत्र होईन । भरवसा पूर्ण असावा ॥२४॥
ऐकोनिया वरासी । आनंदले मानसी । वार्ता सांगता कांतेसी । तेही चित्ती तोषली ॥२५॥
तियेसी झाले गर्भधारण । आनंदले उभयतांचे मन । जो साक्षात् उमारमण । तिच्या उदरी राहिला ॥२६॥
अनंत ब्रह्मांड ज्याचे उदरी । इच्छामात्रे घडी मोडी । तो परमात्मा त्रिपुरारी । गर्भवास भोगीत ॥२७॥
नवमास भरता पूर्ण । कांता प्रसवली पुत्ररत्न । मल्हार दीक्षिते आनंदोन । संस्कार केले यथाविधी ॥२८॥
चिदंबर नामाभिधान । ठेवियले तयालागून । शुक्ल पक्षीय शशिसमान । बाळ वाढू लागले ॥२९॥
प्रत्यक्ष शंकर अवतरला । करु लागला बाललीला । पाहोनी जननी - जनकाला । कौतुक अत्यंत वाटतसे ॥३०॥
पुढे केले मौजीबंधन । वेदशास्त्री झाले निपुण । निघंट शिक्षा व्याकरण । काव्यग्रंथ पढविले ॥३१॥
एकदा यजमानाचे घरी । व्रत होते गजगौरी । चिदंबर तया अवसरी । पूजेलागी आणिले ॥३२॥
मृत्तिकेचा गज करोन । पूजा करिती यजमान । यथाविधी सर्व पूजन । दीक्षित त्यांसी सांगती ॥३३॥
प्राणप्रतिष्ठा मंत्र म्हणता । गजासी प्राण येउनी तत्त्वता । चालू लागला हे पाहता विस्मित झाले यजमान ॥३४॥

बाळपणी ऐशी कृति । पाहोनी सर्व आश्चर्य करिती । हे ईश्वर अवतार म्हणती । सर्वत्र ख्याती पसरली ॥३५॥
ऐशा लीला अपार । दाखविती चिदंबर । प्रत्यक्ष जे का शंकर । जगदुद्धारार्थ अवतरले ॥३६॥
असो पुढे प्रौढपणी । यज्ञ केला दीक्षितांनी । सर्व सामग्री मिळवूनी । द्रव्य बहुत खर्चिले ॥३७॥
तया समयी एके दिनी । ब्राह्मण बैसले भोजनी । तूप गेले सरोनी । दीक्षिताते समजले ॥३८॥
जले भरले होते घट । तयांसी लाविता अमृतहस्त । ते घृत झाले समस्त । आश्चर्य करिती सर्व जन ॥३९॥
तेव्हा पुणे शहारामाजी । पेशवे होते रावबाजी । एके समयी ते सहजी । दर्शनाते पातले ॥४०॥
अन्यायाने राज्य करीत । दुसऱ्यांचे द्रव्य हरीत । यामुळे जन झाले त्रस्त । दाद त्यांची लागेना ॥४१॥
तयांनी हे ऐकोन । मुरगोडी आले धावोन । म्हणती दीक्षितांसी सांगून । दाद आपुली लावावी ॥४२॥
रावबाजीसी वृत्तान्त । कर्णोपकर्णी झाला श्रुत । म्हणती जे सांगतील दीक्षित । ते अमान्य करवेना ॥४३॥
मग दीक्षितांसी निरोप पाठविला । आम्ही येतो दर्शनाला । परी आपण आम्हांला । त्वरित निरोप देईजे ॥४४॥
ऐसे सांगता दीक्षितांप्रती । तया वेळी काय बोलती । आता पालटली तुझी मती । त्वरित मागसी निरोप ॥४५॥
कोपला तुजवरी ईश्वर । जाईल राजलक्ष्मी सर्व । वचनी ठेवी निर्धार । निरोप तुज दिला असे ॥४६॥
सिद्धवाक्य सत्य झाले । रावबाजीचे राज्य गेले । ब्रह्मावर्ती राहिले । परतंत्र जन्मवरी ॥४७॥
एके समयी अक्कलकोटी । दीक्षितांच्या निघाल्या गोष्टी । तेव्हा बोलले स्वामी यती । आम्ही त्याते जाणतो ॥४८॥
यज्ञसमारंभाचे अवसरी । आम्ही होतो त्यांच्या घरी । तूप वाढण्याची कामगिरी । आम्हांकडे तै होती ॥४९॥
लीलाविग्रही श्रीस्वामी । जयांचे आगमन त्रिभुवनी । ते दिक्षितांच्या सदनी । असतील नवल नसेची ॥५०॥
महासिद्ध दीक्षित । त्यांचे वर्णिले अल्पवृत्त । मुरगोडी बाळाप्पा येत ॥ पुण्यस्थान जाणोनी ॥५१॥
तिथे ऐकिला वृत्तान्त । अक्कलकोटी स्वामीसमर्थ । भक्तजन तारणार्थ । यतिरुपे प्रगटले ॥५२॥
अमृतासमान रसाळ कथा । ऐकता पावन श्रोता - वक्ता । करोनिया एकाग्र चित्ता । अवधान द्यावे श्रोते हो ॥५३॥
पुढले अध्यायी कथन । बाळाप्पा करील जप ध्यान । तयाची भक्ती देखोन । स्वामी कृपा करतील ॥५४॥
भक्तजनांची माउली । अक्कलकोटी प्रगटली । सदा कृपेची साउली । आम्हांवरी करो ते ॥५५॥
मागणे हेचि स्वामीप्रती । दृढ इच्छा माझे चित्ती । शंकराची प्रेमळ प्रीति । दास विष्णुवरी असो ॥५६॥
इति श्रीस्वामीचरित्रसारामृत । नाना प्राकृत कथा संमत । सदा परिसोत प्रेमळ भक्त । दशमोऽध्याय गोड हा ॥५७॥
श्री स्वामीराजार्पणमस्तु ॥ शुभं भवतु । श्रीरस्तु ॥

स्वामी समर्थांचा आशीर्वाद "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे."

## अध्याय ११

**|| अकरावा अध्याय ||**

श्री गणेशाय नमः ॥ मागले अध्यायी वर्णिले । बाळाप्पा मुरगोडी आले । पुण्यस्थानी राहिले । तीन रात्री आनंदे ॥१॥
तेथे कळला वृत्तांन्त । अक्कलकोटी साक्षात । यतिरुपे श्रीदत्त । वास्तव्य सांप्रत करिताती ॥२॥
तेथे आपुला मनोदय । सिद्धीस जाईल निःसंशय । फिटेल सर्वही संदेह । श्री सदगरुकृपेने ॥३॥
परी मुरगोडीचे विप्र । बाळाप्पासी सांगत । गाणगापूर विख्यात । महाक्षेत्र भीमातीरी ॥४॥
तेथे आपण जावोनी । बैसावे हो अनुष्ठानी । श्रीगुरु स्वप्नी येवोनि । सांगती तैसे करावे ॥५॥
मानला तयासी विचार । निघाले तेथूनी सत्वर । जवळी केले गाणगापूर । परम पावन स्थान ते ॥६॥
कामना धरोनी चित्ती । सेवेकरी सेवा करिती । जेथे वाहे भीमरथी । स्नान करिती भक्तजन ॥७॥
पुत्रकामना धरुनी चित्ती । आराधिती नृसिंहसरस्वती । दरिद्री धन इच्छिति । रोगीजन आरोग्य ॥८॥
कोणी घालिती प्रदक्षिणा । कोणी ब्राह्मणभोजना । कोणी करिती गंगास्नाना । नमस्कार घालिती कोणी ॥९॥
तेथील सर्व सेवेकरी । नित्य नियमे दोन प्रहरी । मागोनिया मधुकरी । निर्वाह करिती आपुला ॥१०॥
बाळाप्पा तेथे पातले । स्थान पाहोनी आनंदले । नृसिंहसरस्वती पाऊले । प्रेमभावे वदिली ॥११॥
प्रातः काळी उठोनी । संगमावरी स्नान करोनी । जप ध्यान आटपोनी । मागुती येती गावात ॥१२॥
सेवेकऱ्यांबरोबरी । मागोनिया माधुकरी । भोजनोत्तर संगमावरी । परतोनि येती ते ॥१३॥
माध्यान्ह स्नान करोनी । पुन्हा बैसती जप ध्यानी । अस्ता जाता वासरमणी । संध्यास्नान करावे ॥१४॥
करोनिया संध्यावंदन । जप आणि नामस्मरण । रात्र पडता परतोन । ग्रामामाजी येती ते ॥१५॥
बाळाप्पा ते गृहस्थाश्रमी । संतती संपत्ती सर्व सदनी । परान्न ठावे नसे स्वप्नी । सांप्रत भिक्षा मागती ॥१६॥
सदगुरुप्राप्तीकरिता । सोडूनी गृह - सुत - कांता । शीतोष्णाची पर्वा न करिता । आनंदवृत्ती राहती ॥१७॥
पंचपक्वान्ने सेविती घरी । येथे मागती मधुकरी । मिळती कोरड्या भाकरी । उदर पूर्ती न होय ॥१८॥
शीतोष्णाचा होय त्रास । अर्धपोटी उपवास । परी तयांचे मानस । कदा उदास नोहेची ॥१९॥
अय्याराम सेवेकरी । राहत होते गाणगापुरी । त्यांनी देखुनी ऐसीपरी । बाळाप्पासी बोलती ॥२०॥
तुम्ही भिक्षाअ घेवोनी । नित्य यावे आमुचे सदनी । जे जे पडेल तुम्हांस कमी । ते ते आम्ही पुरवू जी ॥२१॥
बाळाप्पासी मानवले । दोन दिवस तैसे केले । पोटभरोनी जेवले । परी संकोच मानसी ॥२२॥
जाणे सोडिले त्यांचे घरी । मागोनिया मधुकरी । जावोनिया संगमावरी । झोळी उदकी बुडवावी ॥२३॥
आणोनिया बाहेरी । बैसोनी तिथे शिळेवरी । मग खाव्या भाकरी । ऐसा नेम चालविला ॥२४॥
ऐसे लोटले काही दिवस । सर्व शरीर झाले कृश । निशिदिनी चिंता चित्तास । सदगुरुप्राप्तीची लागली ॥२५॥
घरदार सोडिले । वनिता पुत्रा त्यागिले । अतितर कष्ट सोशिले । सदगुरुकृपा नोहेची ॥२६॥
हीन आपुले प्राक्तन । भोग भोगवी दारुण । पहावे सदगुरुचरण । ऐसे पुण्य नसेची ॥२७॥
ऐसे विचार निशिदिनी । येती बाळाप्पाचे मनी । तथापि कष्ट सोसोनी । नित्य नेम चालविला ॥२८॥
एक मास होता निश्चिती । स्वप्नी तीन यतिमूर्ती । येवोनिया दर्शन देती । बाळाप्पा चित्ती सुखावे ॥२९॥
पंधरा दिवस गेल्यावरी । निद्रिस्त असता एके रात्री । एक ब्राह्मण स्वप्नाभीतरी । येवोनिया आज्ञापी ॥३०॥
अक्कलकोटी श्रीदत्त । स्वामीरुपे नांदत । तेथे जाउनी त्वरित । कार्य इच्छित साधावे ॥३१॥
पाहोनिया ऐसे स्वप्न । मनी पावले समाधान । म्हणती केले कष्ट दारुण । त्याचे फळ मिळेल की ॥३२॥
अक्कलकोटी त्वरित । जावयाचा विचार करीत । तंव तयासी एक पत्र । शय्येखाली मापडले ॥३३॥
त्यात लिहिली एक ओळी । करु नये उतावळी । ऐसे पाहोनी त्या वेळी । विचार केला मानसी ॥३४॥

आपण केले अनुष्ठान । परी ते जाहले पूर्ण । आणखीही काही दिन । क्रम आपुला चालवावा ॥३५॥
मग कोणे एके दिवशी । बाळाप्पा आले संगमासी । वृक्षातळी ठेवून वस्त्रासी । गेले स्नान करावया ॥३६॥
परतले स्नान करोनी । सत्वर आले त्या स्थानी । वस्त्र उचलिता खालोनी । वृश्चिक एक निघाला ॥३७॥
तयासी त्यांनी न मारिले । नित्यकर्म आटोपिले । ग्रामामाजी परत आले । गेले भिक्षेकारणे ॥३८॥
त्या दिवशी ग्रामाभीतरी । पक्वान्न मिळाले घरोघरी । बाळाप्पा तोषले अंतरी । उत्तम दिन मानिला ॥३९॥
अक्कलकोटी जावयासी । निघाले मग त्याच दिवशी । उत्तम शकुन तयांसी । मार्गावरी जाहले ॥४०॥
चरण - चाली चालोनी । अक्कलकोटी दुसरे दिनी । बाळाप्पा पोचले येवोनी । नगरी रम्य देखिली ॥४१॥
जेथे नृसिंहसरस्वती । यतिरुपे वास करितो । तेथे सर्व सौख्ये नांदती । आनंद भरला सर्वत्र ॥४२॥
तया नगरीच्या नारी । कामधंदा करीता घरी । गीत गाउनी परोपरी । स्वामीमहिमा वर्णिती ॥४३॥
दूर देशीचे ब्राह्मण । वैश्यादिक इतर वर्ण । स्वामीमहिमा ऐकोन । दर्शनाते धावती ॥४४॥
तयांची जाहली गर्दी । यात्रा उतरे घरोघरी । नामघोषे ते नगरी । रात्रदिन गजबजे ॥४५॥
राजे आणि पंडित । शास्त्री वेदांती येत । तैसे भिक्षुक गृहस्थ । स्वामीदर्शनाकारणे ॥४६॥
कानफाटे नाथपंथी । संन्यासी फकीर यती । रामदासी अघोरपंथी । दर्शना येती स्वामींच्या ॥४७॥
कोणी करिती कीर्तन । गायन आणि वादन । कोणी भजनी नाचोन । स्वामीमहिमा वर्णिती ॥४८॥
तया क्षेत्रीचे महिमान । केवी वर्णू मी अज्ञान । प्रत्यक्ष जे वैकुंठभुवन । स्वामीकृपेने जाहले ॥४९॥
पुण्यपावन देखोन नगरी । बाळाप्पा तोषले अंतरी । पूर्वपुण्य तयांचे पदरी । जन्मसार्थक जाहले ॥५०॥
बाळाप्पा होउनी सेवेकरी । स्वहस्ते करील श्रीचाकरी । ती मधुर कथा चतुरी । पुढील अध्यायी परिसावी ॥५१॥
जयाचा महिमा अगाध । जो केवळ सच्चिदानंद । विष्णूशंकरी अभेद । मित्रत्व ठेवो जन्मवरी ॥५२॥
श्रीस्वामी चरित्र सारामृत । नाना प्राकृत कथा संमत । श्रोते सदा परिसोत । एकादशोऽध्याय गोड हा ॥५३॥
॥ श्रीरस्तु ॥ ॥ शुभं भवतु ॥

स्वामी समर्थांचा आशीर्वाद "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे."

## अध्याय १२

**|| बारावा अध्याय ||**

श्री गणेशाय नमः ॥ करावया जगदुद्धार । हरावया भूभार । वारंवार परमेश्वर । नाना अवतार धरीतसे ॥१॥
भक्तजन तारणार्थ । अक्कलकोटी श्रीदत्त । यतिरुपे प्रगट होत । तेची समर्थ श्रीस्वामी ॥२॥
गताध्यायाचे अंती । बाळाप्पा आले अक्कलकोटी । पुण्यनगर पाहोनी दृष्टी । आनंद पोटी नच मावे ॥३॥
त्या दिवशी श्री समर्थ । होते खासबागेत । यात्रा आली बहुत । गर्दी झाली श्रीजवळी ॥४॥
बाळाप्पाचे मानसी । तेव्हा चिंता पडली ऐशी । ऐशा गर्दीत आपणासी । दर्शन कैसे होईल ॥५॥
परी दर्शन घेतल्याविण । आज करु नये भोजन । बाळाप्पाचे तनमन । स्वामीचरणी लागले ॥६॥
दर्शनेच्छा उत्कट चित्ती । खडीसाखर घेवोनी हाती । गर्दीमाजी प्रवेश करिती । स्वामी सान्निध पातले ॥७॥
आजानुबाहु सुहास्यवदन । श्रीस्वामीमूर्ती पाहोन । बाळाप्पाने धावोन । दृढ चरण धरियेले ॥८॥
कंठ सदगदित जाहला । चरणी भाळ ठेविला । क्षणैक मीपण विसरला । परम तोषला मानसी ॥९॥
गंगा मीनली सागरी । जैसे तरंग जलाभीतरी । तैसे बाळाप्पा ते अवसरी । स्वामीचरणी दृढ झाले ॥१०॥
मधुस्तव भ्रमर जैसा । कमलपुष्प न सोडी सहसा । स्वामीचरणी बाळाप्पा तैसा । दृढ जडला स्वभावे ॥११॥
येवोनिया भानावरती । श्रीचरणांची सोडिली मिठी । ब्रह्मानंद न मावे पोटी । स्तोत्र ओठी गातसे ॥१२॥
श्री स्वामी समर्थ त्या वेळी । पडले होते भूतळी । उठोनिया काय केली । लीला एक विचित्र ॥१३॥
सर्व वृक्षांसी आलिंगन । दिले त्यांनी प्रेमेकरोन । बाळाप्पावरचे प्रेम । ऐशा कृतीने दाविले ॥१४॥
धन्यता मानोनी मनी । बाळाप्पा निघाले तेथोनी । परी तयांचे श्रीचरणी । चित्त गुंतले अखंड ॥१५॥
त्यासवे एक जहागिरदार । ते होते बिऱ्हाडावर । स्वयंपाक करोनी तयार । म्हणती जाऊ दर्शना ॥१६॥
बाळाप्पा दर्शन करोन । आले बिऱ्हाडी परतोन । जहागिरदारे नैवेद्य काढोन । बाळाप्पा हाती दीधला ॥१७॥
म्हणती जाउनी स्वामींसी । अर्पण करा नैवेद्यासी । अवश्य म्हणोनि तयांसी । बाळाप्पा तेव्हा चालले ॥१८॥
म्हणती नैवेद्य दाखवून । मग करु प्रसाद भक्षण । मार्गी तयांसी वर्तमान । विदीत एक जाहले ॥१९॥
या समयी श्री समर्थ । असती नृप मंदिरात । राजाज्ञे वाचूनी तेथ । प्रवेश कोणाचा न होय ॥२०॥
ऐसे ऐकूनी वर्तमान । बाळाप्पा मनी झाले खिन्न । म्हणती आज नैवेद्यार्पण । आपुल्या हस्ते नोहेची ॥२१॥
मार्गावरुनी परतले । सत्वर बिऱ्हाडावरी आले । तेथे नैवेद्यार्पण केले । मग सारिले भोजन ॥२२॥
नित्य प्रातः काळी उठोन । षटकर्माते आचरोन । घेवोनी स्वामी दर्शन । जपालागी बैसावे ॥२३॥
श्री शंकर उपास्य दैवत । त्याचे करावे पूजन नित्य । माध्यान्ही येता आदित्य । जपानुष्ठान आटपावे ॥२४॥
करी झोळी घेवोनी । श्री स्वामीजवळी येवोनी । मस्तक ठेवोनी चरणी । जावे भिक्षेकारणे ॥२५॥
मागोनिया माधुकरी । मग यावे बिऱ्हाडावरी । जी मिळेल भाजीभाकरी । त्याने पोट भरावे ॥२६॥
घ्यावे स्वामी दर्शन । मग करावे अनुष्ठान । ऐशा प्रकारे करोन । अक्कलकोटी राहिले ॥२७॥
चोळाप्पा आदीकरोन । सेवेकरी बहुतजण । त्यांत सुंदराबाई म्हणून । मुख्य होती त्या वेळी ॥२८॥
आपण व्हावे सेवेकरी । इच्छा बाळाप्पाचे अंतरी । सुंदराबाईचिये करी । आधिपत्य सर्व असे ॥२९॥
एके दिवशी तयासी । बाई आज्ञा करी ऐशी । आपणही श्रीसेवेसी । करीत जावे आनंदे ॥३०॥
बाळाप्पा मनीं आनंदला । म्हणे सुदिन आज उगवला । सदगुरुसेवेचा लाभ झाला । जाहले सार्थक जन्मांचे ॥३१॥
बहुत जण सेवेकरी । बाई मुख्य त्यांमाझारी । सर्व अधिकार तिच्या करी । व्यवस्थेचा होता पै ॥३२॥
मी प्रिय बहू स्वामींसी । ऐसा अभिमान तियेसी । गर्वभरे इतरांसी । तुच्छ मानू लागली ॥३३॥
या कारणे आपसात । भांडणे होती सदोदित । स्वामीसेवेची तेथ । अव्यवस्था होतसे ॥३४॥

हे बाळप्पांनी पाहोन । नाना युक्ती योजून । मोडुनी टाकिले भांडण । एकचित्त सर्व केले ॥३५॥
कोठेही असता समर्थ । पूजादिक व्हावया यथार्थ । तत्संबंधी सर्व साहित्य । बाळाप्पा सिद्ध ठेविती ॥३६॥
समर्थांच्या येता चित्ती । अरण्यांतही वस्ती करिती । परी तेथेही पूजा आरती । नियमे करिती बाळाप्पा ॥३७॥
बाळाप्पांची प्रेमळ भक्ती । पाहुनी संतोष स्वामीप्रती । दृढ भाव धरुनी चित्ती । सेवा करिती आनंदे ॥३८॥
ऐसे लोटता काही दिवस बाळाप्पाचिया शरीरास । व्याधी जडली रात्रंदिवस । चैन नसे क्षणभरी ॥३९॥
बेबीमधूनिया रक्त । वहातसे दिवसरात्र । तया दुःखे विव्हळ होत । म्हणती कैसे करावे ॥४०॥
भोग भोगिला काही दिन । कागदाची पुडी बेंबीतून । पडली ती पहाता उकलोन । विष त्यात निघाले ॥४१॥
पूर्वी कोण्या कृतघ्ने । बाळाप्पासी यावे मरण । विष दिधले कानोल्यातून । पडले आज बाहेर ॥४२॥
स्वामीकृपेने आजवरी । गुप्त राहिले होते उदरी । सदगुरुसेवा त्यांचे करी । व्हावी लिखित विधीचे ॥४३॥
आजवरी बहुतापरी । बाळाप्पा करी चाकरी । तयाचे अंतर परी । स्वामीमय न जाहले ॥४४॥
प्रत्येक सोमवारी तयांनी । महादेवाची पूजा करोनी । मग यावे परतोनी । स्वामीसेवेकारणे ॥४५॥
हे पाहोनी एके दिवशी । बाई विनवी समर्थांसी । आपण सांगुनि बाळाप्पासी । शंकरपूजनी वर्जावे ॥४६॥
तैशी आझा तयाप्रती । एके दिनी समर्थ करिती । परी बाळाप्पाचे चित्ती । विश्वास काही पटेना ॥४७॥
बाईच्या आग्रहावरुन । समर्थ दिली आज्ञा जाण । हे नसेल सत्य पूर्ण । विनोद केला निश्चये ॥४८॥
पूजा करणे उचित । न करावी हेचि सत्य । यापरी चिठ्ठ्या लिहित । प्रश्न पाहत बाळप्पा ॥४९॥
एक चिठ्ठी तयातून । उचलुनी पाहता वाचून । न करावेची पूजन । तयामाजी लिहिलेसे ॥५०॥
तेव्हा सर्व भ्रांती फिटली । स्वामी आज्ञा सत्य मानिली । ही भानगड पाहिली । श्रीपाद भटजीने ॥५१॥
समर्थांचा पूर्ण भक्त । चोळाप्पा नामे विख्यात । तयाचा हा जामात । श्रीपादभट्ट जाणिजे ॥५२॥
स्वामींपुढे भक्तजन । ठेविती द्रव्यादिक आणोन । ते सुंदराबाई उचलोन । नेत असे सत्वर ॥५३॥
त्यामुळे चोळाप्पाप्रती । अल्प होई द्रव्यप्राप्ती । बाळाप्पामुळे म्हणती । नुकसान होते आपुले ॥५४॥
तेव्हा जमात श्वशुर । उभयता करिती विचार । बाळाप्पाते आता दूर । केले पाहिजे युक्तीने ॥५५॥
श्रीपादभट्ट एके दिवशी । काय बोलती बाळाप्पासी । दासपुत्र सोडुनी देशी । आपण येथे राहिला ॥५६॥
आपण आल्यापासोन । आमुचे होते नुकसान । ऐसे बोल ऐकोन । बाळाप्पा मनी खिन्न झाला ॥५७॥
बाळाप्पा बोले वचन । तुमचे अन्न खावोन । करितो तुमचे नुकसान । व्यर्थ माझा जन्म हा ॥५८॥
स्वामीनी मज आज्ञा द्यावी । मी जातो आपुल्या गावी । परी तुम्ही युक्ती योजावी । आज्ञा होईल ऐशीच ॥५९॥
श्रीपादभट्टे एके दिवशी । विचारले समर्थांसी । कुलदेवतेच्या दर्शनासी । जावया इच्छी बाळाप्पा ॥६०॥
ऐसे ऐकुनिया समर्थ । हास्यमुखे काय बोलत । कुलदेवतेचे दर्शन नित्य । बाळाप्पा येथे करीतसे ॥६१॥
तेव्हा निरुत्तर जाहला । ऐसा उपाय खुंटला । मग तयाने पाहिला । कारभार चिठ्ठ्यांचा ॥६२॥
तयाने पुसिले वर्तमान । बाळाप्पा सांगे संपूर्ण । श्रीपादभट्टे ऐकोन । कापट्य मनी आणिले ॥६३॥
म्हणे जावया आपणासी । समर्थ न देती आज्ञेसी । तरी टाकून चिठ्ठ्यांसी । आज्ञा घ्यावी आपण ॥६४॥
तयांचे कपट न जाणोनी । अवश्य म्हणे त्याच दिनी । दोन चिठ्ठ्या लिहोनी । उभयतांनी टाकिल्या ॥६५॥
चिठ्ठी आपुल्या करी । भटजी उचली सत्वरी । येथे राहुनी चाकरी । करी ऐसे लिहिलेसे ॥६६॥
भटजी मनी खिन्न झाला । सर्व उपाय खुंटला । महाराज आता बाळाप्पाला । न सोडितील निश्चये ॥६७॥
स्वामी चरणी दृढ भक्ती । बाळाप्पाची जडली होती । कैसा दूर तयाप्रती । करितील यति दयाळ ॥६८॥
जो केवळ दयाघन । भक्तकाजकल्पद्रुम । विष्णू शंकर दोघेजण । तयांसी शरण सदैव ॥६९॥
इति श्री स्वामीचरित्र । नाना प्राकृत कथा संमत । सदा प्रेमळ परिसोत । द्वादशोऽध्याय गोड हा ॥७०॥
श्रीराजाधिराज योगीराज श्रीस्वामीसमर्थमहाराजार्पणमस्तु ॥

स्वामी समर्थांचा आशीर्वाद "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे."

## अध्याय १३

**|| तेरावा अध्याय ||**

श्री गणेशाय नमः ॥
शुक्लपक्षीचा शशिकार । वाढे जैसा उत्तरोत्तर । तैसे हे स्वामी चरित्र । अध्यायाध्यी वाढले द्वादशोऽध्यायाचे अंती ॥१॥
श्रीपादभट्ट बाळाप्पाप्रती । कपट युक्तीने फसवू पाहती । परी झाले व्यर्थची ॥२॥
खिन्न झाला चोळाप्पा । म्हणे श्रीची पूर्ण कृपा । मजहुनी तया बाळाप्पा । प्रिय असे जाहला ॥३॥
वर्तले ऐसे वर्तमान । बाळाप्पा एकनिष्ठा धरोन । स्वामीसेवा रात्रदिन । अत्यानंदे करीतसे ॥४॥
स्वयंपाकादिक करावयासी । लज्जा वाटतसे त्यासी । तयाते एके समयासी । काय बोलती समर्थ ॥५॥
निर्लज्जासी सन्निध गुरु । असे जाण निरंतरु । ऐसे बोलता सदगुरु । बाळाप्पा मनी समजला ॥६॥
अनेक उपाये करोन । शुद्ध केले बाळाप्पाचे मन । स्वामीविणे दैवत अन्य । नसेचि थोर या जगी ॥७॥
सेवेकऱ्यांमाजी वरिष्ठ । सुंदराबाई होती तेथ । तिने सेवेकऱ्यास नित्य । त्रास द्यावा व्यर्थची ॥८॥
नाना प्रकारे बोलोन । करी सर्वांचा अपमान । परी बाळाप्पावरी पूर्ण । विश्वास होता तियेचा ॥९॥
परी कोणे एके दिवशी । मध्यरात्रीच्या समयासी । लघुशंका लागता स्वामीसी । बाळाप्पाते उठविले ॥१०॥
श्रीते धरोनिया करी । घेऊनी गेले बाहेरी । पाहोनिया ऐशी परी । बाई अंतरी कोपली ॥११॥
म्हणे याने येवोन । स्वामी केले आपणा आधीन । माझे गेले श्रेष्ठपण । अपमान जाहला ॥१२॥
तैपासूनी बाळाप्पासी । त्रास देत अहर्निशी । गाऱ्हाणे सांगता समर्थांसी । बाईते शब्दे ताडिती ॥१३॥
अक्कलकोटी श्रीसमर्थ । प्रथमतः ज्याचे घरी येत । तो चोळाप्पा विख्यात । स्वामी भक्त जाहला ॥१४॥
एक तपपर्यंत । स्वामीसेवा तो करीत । तयासी द्रव्याशा बहुत । असे सांप्रत लागली ॥१५॥
दिवाळीचा सण येत । राजमंदिरामाजी समर्थ । राहिले असता आनंदात । वर्तमान वर्तले ॥१६॥
कोण्या भक्ते समर्थांसी । अर्पिले होते चंद्रहारासी । सणानिमित्त त्या दिवशी । अगांवरी घालावा ॥१७॥
राणीचिये मनांत । विचार येता त्वरित । सुंदराबाईसी बोलत । चंद्रहार द्यावा की ॥१८॥
सुंदराबाई बोलली । तो आहे चोळाप्पाजवळी । ऐसे ऐकतां त्या काळी । जमादार पाठविला ॥१९॥
गंगुलाल जमादार । चोळाप्पाजवळी ये सत्वर । म्हणे द्यावा जी चंद्रहार । राणीसाहेब मागती ॥२०॥
चोळाप्पा बोले तयांसी । हार नाही आम्हापासी । बाळाप्पा ठेवितो तयासी । तुम्ही मागून घ्यावा की ॥२१॥
ऐसे ऐकूनी उत्तर । गंगुलाल जमादार । बाळाप्पा - जवळी येउनी सत्वर । हार मागू लागला ॥२२॥
बाळाप्पा बोले उत्तर । आपणापासी चंद्रहार । परी चोळाप्पाची त्यावर । सत्ता असे सर्वस्वे ॥२३॥
ऐसे ऐकुनी बोलणे । जमादार पुसे चोळाप्पाकारणे । जबाब दिधला चोळाप्पाने । बाळाप्पा देती तरी घेइजे ॥२४॥
ऐसे भाषण ऐकोन । जमादार परतोन । नृपमंदिरी येवोन । वर्तमान सर्व सांगे ॥२५॥
चोळाप्पाची ऐकून कृती । राग आला राणीप्रती । सुंदराबाईनेही गोष्टी । तयाविरुद्ध सांगितल्या ॥२६॥
कारभार चोळाप्पाचे करी । जो होता आजवरी । तो काढूनी त्यास दूरी । करावे राणी म्हणतसे ॥२७॥
पहिलेच होते बाईच्या मनी । साहाय्य झाली आता राणी । सुंदराबाईच्या गगनी । हर्ष तेव्हा न समावे ॥२८॥
चोळाप्पाने आजवरी । केली समर्थांची चाकरी । धनप्राप्ती तया भारी । समर्थकृपेने होतसे ॥२९॥
असो एके अवसरी । काय झाली नवलपरी । बैसली समर्थांची स्वारी । भक्तमंडळी वेष्टित ॥३०॥
एक वस्त्र तया वेळी । पडले होते श्रीजवळी । तयाची करोनिया झोळी । समर्थे करी घेतली ॥३१॥
अल्लख शब्द उच्चारिला । म्हणती भिक्षा द्या आम्हाला । तया वेळी सर्वत्राला । आश्चर्य वाटले ॥३२॥
झोळी घेतली समर्थे । काय असे उणे तेथे । जे जे दर्शना आले होते । त्यांनी भिक्षा घातली ॥३३॥
कोणी एक कोणी दोन । रुपये टाकती आणोन । न लागता एक क्षण । शंभरावर गणती झाली ॥३४॥

झोळी चोळाप्पाते देवोन । समर्थ बोले काय वचन । चोळाप्पा तुझे फिटले रीण । स्वस्थ आता असावे ॥३५॥
पाहोनिया द्रव्यासी । आनंद झाला तयासी । परी न आले मानसी । श्रीचरण अंतरले ॥३६॥
तयासी झाले मास दोन । पुढे काय झाले वर्तमान । राणीच्या आज्ञेने शिपाई दोन । स्वामीजवळी पातले ॥३७॥
त्यांनी उठवून चोळाप्पासी । आपण बैसले स्वामीपाशी । चोळाप्पाच्या मानसी । दुःख फार जाहले ॥३८॥
स्वामीपुढे वस्तू येती । त्या शिपाई उचलिती । चोळाप्पाते काही न देती । ने तरी घेती हिरावोनी ॥३९॥
चोळाप्पासी दूर केले । बाईसी बरे वाटले । ऐसे कांही दिवस गेले । बाळाप्पा सेवा करिताती ॥४०॥
कोणे एके अवसरी । सुंदराबाई बाळाप्पावरी । रागावोनी दुष्टोत्तरी । ताडण करी बहुसाळ ॥४१॥
ते ऐकोनी बाळाप्पासी । दुःख झाले मानसी । सोडून स्वामीचरणांसी । म्हणती जावे येथोनी ॥४२॥
ऐसा केला विचार । जाहली असता रात्र । बाळाप्पा गेले बिऱ्हाडावर । खिन्न झाले मानसी ॥४३॥
आज्ञा समर्थांची घेवोनी । म्हणती जावे येथोनी । याकरिता दुसरे दिनी । समर्थांजवळी पातले ॥४४॥
आपुली आज्ञा घ्यावयासी बाळाप्पा येतो या समयासी । अंतर्ज्ञानी समर्थांसी । तत्काळ विदित जाहले ॥४५॥
तेव्हा एक सेवेकऱ्यांस । बोलले काय समर्थ । बाळाप्पा दर्शनास येत । त्यासी आसन दाखवावे ॥४६॥
बाळाप्पा येता त्या स्थानी । आसन दावले सेवेकऱ्यांनी । तेव्हा समजले निजमनी । आज्ञा आपणा मिळेना ॥४७॥
कोठे मांडावे आसन । विचार पडला त्यालागून । तो त्याच रात्री स्वप्न । बाळाप्पाने देखिले ॥४८॥
श्रीमारुतीचे मंदिर । स्वप्नी आले सुंदर । तेथे जाउनी सत्वर । आसन त्यांनी मांडिले ॥४९॥
श्रीस्वामी समर्थ । या मंत्राचा जप करीत । एक वेळ दर्शना येत । हिशेब ठेवीत जपाचा ॥५०॥
काढूनी दिले बाळाप्पासी । आनंद झाला बाईसी । गर्वभरे ती कोणासी । मानीनाशी जाहली ॥५१॥
सुंदरबाईसी करावे दूर । समर्थांचा झाला विचार । त्याप्रमाणे चमत्कार । करोनिया दावि ती ॥५२॥
जे कोनी दर्शना येत । त्यांसी बाई द्रव्य मागत । धन - धान्य साठवीत । ऐशा प्रकारे करोनी ॥५३॥
बाईची कृत्ये दरबारी । विदित केली थोर थोरी । बाईने रहावे दूरी । श्रीचरणापासून ॥५४॥
परी राणीची प्रीति । बाईवरी बहू होती । याकारणे कोणाप्रती । धैर्य कही होईना ॥५५॥
अक्कलकोटी त्या अवसरी । माधवराव बर्वे कारभारी । तयांसी हुकूम झाला सत्वरी । बाईसी दुरी करावे ॥५६॥
परी राणीस भिवोनी । तैसे न केले तयांनी । समर्थ दर्शनासी एके दिनी । कारभारी पातले ॥५७॥
तयांसी बोलती समर्थ । कैसा करिता कारभार । ऐसे ऐकोनिया उत्तर । बर्वे मनी समजले ॥५८॥
मग त्यांनी त्याच दिवशी । पाठविले फौजदारासी । कैद करुनीया बाईसी । आणावी म्हणती सत्वर ॥५९॥
आज्ञेप्रमाणे सत्वर । बाईसी बांधी फौजदार । बाई करी शोक फार । घेत ऊर बडवूनी ॥६०॥
स्वामीचिंया सेवेकरिता । सरकारांतूनी तत्त्वता । पंच नेमूनी व्यवस्था । केली असे नृपराये ॥६१॥
मग सेवा करावयासी । घेउनी गेले बाळाप्पासी । म्हणती देऊ तुम्हांसी । पगार सरकारांतूनी ॥६२॥
बाळाप्पा बोलले तयांसी । द्रव्याशा नाही आम्हांसी । आम्ही निर्लोभ मानसी । स्वामीसेवा करु की ॥६३॥
बाळाप्पाचा जप होता पूर्ण । एक भक्तास सांगोन । करविले श्रीती उद्यापन । हिशेब जपाचा घेतला ॥६४॥
बाळाप्पांनी चाकरी । एक तप सरासरी । केली उत्तम प्रकारी । समर्था ते प्रिय झाले ॥६५॥
अक्कलकोट नगरात । अद्यापि बाळाप्पा रहात । श्रीपादुकांची पूजा करीत । निराहार राहोनी ॥६६॥
जे जे झाले स्वामीभक्त । त्यात बाळाप्पा श्रेष्ठ । तयावरी श्री समर्थ । करीत होते प्रेम बहू ॥६७॥
ऐसे बाळाप्पाचे चरित्र । वर्णिले असे संकलित । स्वामी चरित्र सारामृत । चरित्रसार घेतले ॥६८॥
दृढनिश्चय आणि भक्ती । तैसी सदगुरुचरणी आसक्ति । तेणे येत मोक्ष हाती । अन्य साधने व्यर्थची ॥६९॥
निश्चयाचे उदाहरण । हे चरित्र असे पूर्ण । श्रोती होउनी सावधान । श्रवणी आदर धरावा ॥७०॥
उगीच करिती दांभिक भक्ती । त्यावरी स्वामी कृपा न करिती । सदभावे जे नमस्कारिती । त्यावरी होती कृपाळू ॥७१॥
पुढले अध्यायी सुंदर कथा । ऐका श्रोते देऊनी चित्ता । जेणे निवारे सर्व व्यथा । पापराशी दग्ध होती ॥७२॥
अक्कलकोटनिवासिया । जयजयाजी स्वामीराया । रात्रंदिन तुझ्या पाया । विष्णू शंकर वंदिती ॥७३॥
इति श्रीस्वामीचरित्र । नाना प्राकृत कथा संमत । सदा भक्त परिसोत । त्रयोदशोऽध्याय गोड हा ॥७४॥
इति श्रीस्वामीचरित्रसारामृते त्रयोदशोऽध्यायः ॥ श्रीस्वामीचरणार्पणमस्तु । शुभं भवतु ॥

स्वामी समर्थांचा आशीर्वाद "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे."

## अध्याय १४

**|| चौदावा अध्याय ||**

श्री गणेशाय नमः । जयजयाजी करुणाघना । जयजयाजी अघशमना । जयजयाजी परमपावना । दीनबंधो जगदगुरु ॥१॥
आपुल्या कृपे निश्चित । त्रयोदश अध्यायापर्यंत । वर्णिले स्वामी चरित्रामृत । आता पुढे वदवावे ॥२॥
आपुल्या कथा वदावया । बुद्धी देई स्वामीराया । चरित्र ऐकोनी श्रोतया । संतोष होवो बहुसाळ ॥३॥
कैसी करावी आपुली भक्ती । हे नेणे मी मंदमती । परी प्रश्न करिता श्रोती । अल्पमती सांगतसे ॥४॥
प्रातः काळी उठोन । आधी करावे नामस्मरण । अंतरी घ्यावे स्वामीचरण । शुद्ध मन करोनी ॥५॥
प्रातः कर्मे आटपोनी । मग बैसावे आसनी । भक्ती धरोनी स्वामीचरणी । पूजन करावे विधियुक्त ॥६॥
एकाग्र करोनी मन । घालावे शुद्धोदक स्नान । सुगंध चंदन लावोन । सुवासिक कुसूमे अर्पावी ॥७॥
धूप - दीप - नैवेद्य । फल तांबूल दक्षिणा शुद्ध । अर्पावे नाना खाद्य । नैवेद्याकारणे स्वामींच्या ॥८॥
षोडशोपचारे पूजन । करावे सदभावे करुन । धूप - दीपार्ती अर्पून । नमस्कार करावा ॥९॥
जोडोनिया दोन्ही कर । उभे रहावे समोर । मुखे म्हणावे प्रार्थना स्तोत्र । नाममंत्र श्रेष्ठ पै ॥१०॥
आजानुबाहू सुहास्यवदन । काषायवस्त्र परिधान । भव्य आणि मनोरम । मूर्ती दिसे साजिरी ॥११॥
मग करावी प्रार्थना । जयजयाजी अघहरणा । परात्परा कैवल्यसदना । ब्रह्मानंदा यतिवर्या ॥१२॥
जयजयाजी पुराणपुरुषा । लोकपाला सर्वेशा । अनंत ब्रह्मांडाधीशा । वेदवंद्या जगदगुरु ॥१३॥
सुखधामनिवासिया । सर्वसाक्षी करुणालया । भक्तजन ताराया । अनंतरुपे नटलासी ॥१४॥
तू अग्नि तू पवन । तू आकाश तू जीवन । तूची वसुंधरा पूर्ण । चंद्र सूर्य तूच पै ॥१५॥
तू विष्णू आणि शंकर । तू विधाता तू इंद्र । अष्टदिकपालादि समग्र । तूच रुपे नटलासी ॥१६॥
कर्ता आणि करविता । तूच हवी आणि होता । दाता आणि देवविता । तूच समर्था निश्चये ॥१७॥
जंगम आणि स्थिर । तूच व्यापिले समग्र । तुजलागी आदिमध्याग्र । कोठे नसे पाहता ॥१८॥
असोनिया निर्गुण । रुपे नटलासी सगुण । ज्ञाता आणि ज्ञान । तूच एक विश्वेशा ॥१९॥
वेदांचाही तर्क चाचरे । शास्त्रांतेहि नावरे । विष्णू शंकर एकसरे । कुंठित झाले सर्वहि ॥२०॥
मी केवळ अल्पमती । करु केवी आपुली स्तुती । सहस्त्रमुखही निश्चिती । शिणला ख्याती वर्णिता ॥२१॥
दृढ ठेविला चरणी माथा । रक्षावे मजसी समर्था । कृपाकटाक्षे दीनानाथा । दासाकडे पहावे ॥२२॥
आता इतुकी प्रार्थना । आणावी जी आपुल्या मना । कृपासमुद्री या मीना । आश्रय देईजे सदैव ॥२३॥
पाप ताप आणि दैन्य । सर्व जावो निरसोन । इहलोकी सौख्य देवोन । परलोकसाधन करवावे ॥२४॥
दुस्तर हा भवसागर । याचे पावावया पैलतीर । त्वन्नाम तरणी साचार । प्राप्त होवो मजला ते ॥२५॥
आशा मनीषा तृष्णा । कल्पना आणि वासना । भ्रांती भुली नाना । न बाधोत तुझ्या कृपे ॥२६॥
किती वर्णू आपुले गुण । द्यावे मज सुख साधन । अज्ञान तिमिर निरसोन । ज्ञानार्क हृदयी प्रगटो पै ॥२७॥
शांती मनी सदा वसो । वृथाभिमान नसो । सदा समाधान वसो । तुझ्या कृपेने अंतरी ॥२८॥
भवदुःखे हे निरसो । तुझ्या भजनी चित्त वसो । वृथा विषयांची नसो । वासना या मनाते ॥२९॥
सदा साधु - समागम । तुझे भजन उत्तम । तेणे होवो हा सुगम । दुर्गम जो भवपंथ ॥३०॥
व्यवहारी वर्तता । न पडो भ्रांती चित्ता । अंगी न यावी असत्यता । सत्य विजयी सर्वदा ॥३१॥
आप्तवर्गाचे पोषण । न्याय मार्गावलंबन । इतुके द्यावे वरदान । कृपा करुनी समर्था ॥३२॥
असोनिया संसारात । प्राशीन व नामामृत । प्रपंच आणि परमार्थ । तेणे सुगम मजलागी ॥३३॥
ऐशी प्रार्थना करिता । आनंद होय समर्था । संतोषोनि तत्वता । वरप्रसाद देतील ॥३४॥

गुरुवारी उपोषण । विधियुक्त करावे स्वामीपूजन । प्रदोषसमय होता जाण । उपोषणे सोडावे ॥३५॥
तेणे वाढेल बुद्धी । सत्यसत्य हे त्रिशुद्धी । अनुभवाची प्रसिद्धि । करिताती स्वामीभक्त ॥३६॥
श्री स्वामी समर्थ । ऐसा षडाक्षरी मंत्र । प्रीतीने जपावा अहोरात्र । तेणे सर्वार्थ पाविजे ॥३७॥
ब्राह्मणा क्षत्रियांदिका लागोनी । मुख्य जप हा चहूवर्णी । स्त्रियांनीही निशिदिनी । जप याचा करावा ॥३८॥
प्रसंगी मानसपूजा करिता । तेहि प्रिय होय समर्था । स्वामीचरित्र वाचिता ऐकता । सकल दोष जातील ॥३९॥
कैसी करावी स्वामी भक्ती । हे नेणे मी मंदमती । परी असता शुद्धचित्ती । तेची भक्ती श्रेष्ठ पै ॥४०॥
आम्ही आहो स्वामी भक्त । मिरवू नये लोकात । जयासी भक्तीचा दभ व्यर्थ । निष्फळ भक्ती तयाची ॥४१॥
दंभ षोडशोपचारे पूजिता । परी प्रिय नव्हेचि समर्था । भावे पत्र - पुष्प अर्पिता । समाधान स्वामीते ॥४२॥
जयाजयाजी आनंदकंदा । जयाजयाजी करुणासमुद्रा । विष्णू शंकराचिया छंदा । कृपा करोनी पुरवावे ॥४३॥
श्री स्वामीचरित्र सारामृत । नाना प्राकृत कथा संमत । सदा ऐकोत भाविक भक्त । चतुर्दशोऽध्याय गोड हा ॥४४॥
श्रीरस्तु । शुभं भवतु ॥

स्वामी समर्थांचा आशीर्वाद "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे."

## अध्याय १५

**|| पंधरावा अध्याय ||**

श्री गणेशाय नमः ॥ नलगे करणे तीर्थाटन । हठयोगादिक साधन । वेदाभ्यास शास्त्रज्ञान । मोक्षसाधनकारणे ॥१॥
अंतरी स्वामीभक्ती जडता । चारी पुरुषार्थ येती हाता । पाप ताप दैन्य वार्ता । तेथे काही नुरेची ॥२॥
वर्तत असता संसारी । स्वामीपद आठवी अंतरी । तयाते या भवसागरी । निश्चये तारिती समर्थ ॥३॥
सर्व कामना पुरवोन । अंती दाविती सुरभुवन । जे नर करिती नामस्मरण । ते मुक्त याच देही ॥४॥
मंगळवेढे ग्रामात । राहत असता श्रीसमर्थ । ग्रामवासी जन समस्त । वेडा म्हणती तयांसी ॥५॥
आपुली व्हावी प्रख्याती । हे नसेचि जयाच्या चित्ती । स्वेच्छे वर्तन करिती । काही न जाणती जनवार्ता ॥६॥
कोणासी भाषण न करिती । कवणाचे गृहा न जाती । दुष्टोत्तरे जन ताडिती । तरी क्रोध नयेची ॥७॥
शीतोष्णाची भीती । नसेची ज्यांचिया चित्ती । सदा अरण्यात वसती । एकान्तस्थळी समर्थ ॥८॥
सुखदुःख समान । सदा तृप्त असे मन । लोकवस्ती आणि व्रन । दोन्ही जया सारखी ॥९॥
परमेश्वरस्वरुप यती । ऐसे ज्यांच्या वाटे चित्ती । ते करिता स्वामीभक्ती । जन हासती तयाते ॥१०॥
या वेळी मंगळवेढ्यात । बसाप्पा तेली राहात । दारिद्र्ये पीडिला बहुत । दीन स्थिती तयाची ॥११॥
बसाप्पा व्यवसाय करी । पुरे न पडे त्यामाझारी । अठराविश्वे दारिद्र्य घरी । पोटा भाकरी मिळेना ॥१२॥
तो एके दिनी फिरत फिरत । सहज वनामाजी जात । तो देखिले श्रीसमर्थ । दिगंबर यतिराज ॥१३॥
कंटकशय्या करोन । तियेवरी केले शयन । ऐसे नवल देखोन । लोटांगण घालितसे ॥१४॥
अंतरी पटली खूण । यति ईश्वरांश पूर्ण । म्हणूनी सुखे शयन । कंटकशय्येवरी केले ॥१५॥
अष्टभावे दाटोनी । माथा ठेवी श्रीचरणी । म्हणे कृपाकटाक्षे करोनी । दासाकडे पहावे ॥१६॥
स्वामीचरणांचा स्पर्श होता । ज्ञानी झाला तो तत्त्वता । कर जोडोनिया स्तविता । झाला बहुत प्रकारे ॥१७॥
सकल ब्रह्मांडनायका । कृपाधना भक्तपालका । पाप, ताप आणि दैन्य हारका । विश्वपते जगदगुरु ॥१८॥
पाहुनिया प्रेमळ भक्ती । अंतरी संतोषले यति । वरदहस्त ठेविती । तत्काळ मस्तकी तयाचे ॥१९॥
बसाप्पाचे श्रीचरणी । मन जडले तैपासोनी । राहू लागला निशिदिनी । स्वामीसन्निध आनंदे ॥२०॥
जिकडे जातील समर्थ । तिकडे आपणही जात । ऐसे पाहुनी हासत । कुटिल जन तयाते ॥२१॥
वेड्याच्या नादी लागला । संसार याने सोडिला । घरदार विसरला । वेडा झाला निश्चये ॥२२॥
मग बसाप्पाची कांता । ऐकूनिया ऐशी वार्ता । करीतसे आकांता । म्हणे घर बुडाले ॥२३॥
आधीच आम्ही निर्धन । परी मोलमजुरी करोन । करीत होतो उपजीवन । आता काय करावे ॥२४॥
बसाप्पा येता गृहासी । दुष्टोत्तरे बोले त्यासी । म्हणे सोडिले संसारासी । वेड काय लागले ॥२५॥
परी बसाप्पाचे चित्त । स्वामींचरणी आसक्त । जनापवादा न भीत । नसे चाड कोणाची ॥२६॥
ऐसे लोटले काही दिन । काय झाले वर्तमान । ते होवोनी सावधान । चित्त देऊनी ऐकावे ॥२७॥
एके दिवशी अरण्यात । बसाप्पा स्वामीसेवा करीत । तव झाली असे रात । घोर तम दाटले ॥२८॥
चित्त जडले श्रीचरणी । भीती नसे काही मनी । दोन प्रहर होता रजनी । समर्थ उठोनी चालले ॥२९॥
पुढे जाता समर्थ । बसाप्पा मागे चालत । प्रवेशले घोर अरण्यात । क्रूर श्वापदे ओरडती ॥३०॥
आधीच रात्र अंधारी । वृक्ष दाटले नाना परी । मार्ग न दिसे त्या माझारी । चरणी रुतती कंटक ॥३१॥
परी बसाप्पाचे चित्ती । न वाटे काही भीती । स्वामीचरणी जडली वृत्ती । देहभान नसेची ॥३२॥

तो समर्थ केले नवल । प्रगट झाले असंख्य व्याल । भूभाग व्यापिला सकळ । तेजे अग्नीसमान ॥३३॥
पादस्पर्श सर्पा झाला । बसाप्पा भानावरी आला । अपरिमित देखिला । सर्पसमूह चोहीकडे ॥३४॥
वृक्षशाखा अवलोकित । तो सर्पमय दिसत । मागे पुढे पहात । तो दिसत सर्पमय ॥३५॥
वाहोनिया ऐशी परी । भयभीत झाला अंतरी । तो तयासी मधुरोत्तरी । समर्थ काय बोलले ॥३६॥
भिऊ नको या समयी । जितुके पाहिजे तितुके घेई । न करी अनुमान काही । दैव तुझे उदेले ॥३७॥
ऐसे बोलता समर्थ । बसाप्पा भय सोडूनी त्वरित । करी घेवोनि अंगवस्त्र । टाकीत एका सर्पावरी ॥३८॥
गुंडाळोनी सर्पा त्वरित । सत्वर उचलोनी घेत । तव सर्प झाले गुप्त । तेजही नष्ट जाहले ॥३९॥
तेथोनिया परतले । सत्वर ग्रामामाजी आले । बसाप्पासहित बैसले । समर्थ एका देऊळी ॥४०॥
तेथे आपुले अंगवस्त्र । बसाप्पा सोडोनी पहात । तव त्यात सुवर्ण दिसत । सर्प गुप्त झाला ॥४१॥
ऐसे नवल देखोनी । चकित झाला अंतःकरणी । माथा ठेवी स्वामींचरणी । प्रेमाश्रू नयनी वहाती ॥४२॥
त्यासी बोलती यतीश्वर । घरी जावे त्वा सत्वर । सुखे करावा संसार । दारा पुत्रा पोशिजे ॥४३॥
आनंदोनी मानसी । बसाप्पा गेला गृहासी । वर्तमान सांगता कांतेसी । तेहि अंतरी सुखावे ॥४४॥
कृपा होता समर्थांची । वार्ता नुरेची दैन्याची । याविषयी ही बसाप्पाची । गोष्ट साक्ष देतसे ॥४५॥
असो तो बसाप्पा भक्त । संसारसुख उपभोगीत । रात्रदिन " श्री स्वामी समर्थ " । मंत्र जपे त्यादरे ॥४६॥
पाप, ताप आणि दैन्य । ज्यांचे दर्शने निरसोन । जाय ते पद रात्रंदिन । प्रेमे विष्णू शंकर ध्याती ॥४७॥
पुढे कथा सुंदर । स्वामीसुताचे चरित्र । मन करोनिया स्थिर । सादर होऊनी ऐकावे ॥४८॥
इति श्री स्वामीचरित्रामृत । नाना प्राकृत कथा संमत । सदा भाविक परिसोत । पंचदशोऽध्याय गोड हा ॥४९॥
श्री स्वामीचरणार्पणमस्तु ॥ श्रीरस्तु ॥ शुभं भवतु ॥

स्वामी समर्थांचा आशीर्वाद "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे."

## अध्याय १६

**|| सोळावा अध्याय ||**

श्री गणेशाय नमः ॥ भक्तजन तारणार्थ । यतिरुपे श्रीदत्त । भूवरी प्रगट होत । अक्कलकोटी वास केला ॥१॥
जे जे झाले त्यांचे भक्त । त्यात श्रेष्ठ स्वामीसुत । ऐकता त्यांचे चरित्र । महादोष जातील ॥२॥
प्रसिद्ध मुंबई शहरात । हरीभाऊ नामे विख्यात । आनंदे होते नांदत । निर्वाह करीत नौकरीने ॥३॥
कोकणप्रांती राजापूर । तालुक्यात इटिया गाव सुंदर । हरीभाऊ तेथील राहणार । जात मराठे तयांची ॥४॥
ते खोत त्या गावचे । होते संपन्न पूर्वीचे । त्याच गावी तयांचे । माता - बंधू राहती ॥५॥
मुंबईत तयांचे मित्र । ब्राह्मण उपनाव पंडित । ते करिता व्यापार त्यात । तोटा आला तयांसी ॥६॥
एके समयी पंडितांनी । स्वामीकीर्ति ऐकिली कानी । तेव्हा भाव धरोनी मनी । नवस केला स्वामीते ॥७॥
जरी आठ दिवसात । मी होईन कर्जमुक्त । तरी दर्शना त्वरित । अक्कलकोटी येईन ॥८॥
यासी सात दिवस झाले । काही अनुभव न आले । तो नवल एक वर्तले । ऐका चित्त देउनि ॥९॥
हरीभाऊ आणि त्यांचे मित्र । अफूचा व्यापार करिता त्यात । आपणा नुकसान सत्य । येईल ऐसे वाटले ॥१०॥
त्यांनी काढिली एक युक्ती । बोलावुनी पंडिताप्रती । सर्व वर्तमान त्या सांगती । म्हणती काय करावे ॥११॥
हे नुकसान भरावयासी । द्रव्य नाही आम्हांपाशी । फिर्याद होता अब्रुसी । बट्टा लागेल आमुच्या ॥१२॥
तेव्हा पंडित बोलले । मलाही कर्ज काही झाले । निघाले माझे दिवाळे । यात संशय असेना ॥१३॥
तुम्ही व्हावया कर्जमुक्त । यासी करावी युक्ती एक । तुमचा होउनी मी मालक । लिहून देतो पेढीवर ॥१४॥
उभयतांसी ते मानले । तत्काळ तयांपरी केले । तो नवल एक वर्तले । ऐका सादर होवोनी ॥१५॥
अफूचा भाव वाढला । व्यापारात नफा जाहला । हे सांगावया पंडिताला । मारवाडी आला आनंदे ॥१६॥
पंडित ऐकोन वर्तमान । आनंद झाला त्यालागोन । हरीभाऊते भेटोन । वृत्त निवेदन केले ॥१७॥
अक्कलकोटी स्वामी समर्थ । सांप्रतकाळी वास करीत । त्यांचीच कृपा ही सत्य । कर्जमुक्त झालो आम्ही ॥१८॥
नवस केला तयांसी । जाऊ आता दर्शनासी । वार्ता ऐकूनी उभयतांसी । चमत्कार वाटला ॥१९॥
ज्यांनी आपुले मनोरथ । पूर्ण केले असती सत्य । ऐसे जे का समर्थ । अक्कलकोटी नांदती ॥२०॥
तरी अक्कलकोटाप्रती । येतो तुमच्या सांगाती । आम्ही पाहुनिया स्वामीमूर्ती । जन्म सार्थक करु की ॥२१॥
गजानन हरिभाऊ पंडित । त्रिवर्ग अक्कलकोटी जात । समर्थांचे दर्शन घेत । पूजन करीत भक्तीने ॥२२॥
पाहूनी समर्थांची मूर्ती । तल्लीन हरीभाऊंची वृत्ती । मुख पाहता नयनपाती । न लवती तयांची ॥२३॥
तेव्हा समर्थे तयांसी । शिव, राम, मारुती ऐसी । नामे दिधली त्रिवर्गासी । आणिक मंत्र दिधले ॥२४॥
पंडिता राम म्हटले । गजानना शिवनाम दिधले । मारुती हरीभाऊस म्हटले । तिघे केले एकरुप ॥२५॥
मग समर्थे त्या वेळे । त्रिवर्गा जवळ बोलाविले । तिघांशी तीन श्लोक दिधले । मंत्र म्हणोनी ते ऐका ॥२६॥
॥ श्लोक ॥ गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णूः गुरुर्देवो महेश्वरः । गुरुर्देवपरब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः ॥१॥
ऐसा मंत्र हरीभाऊते । दिधला असे समर्थे । तेव्हा तयाच्या आनंदाते । पारावार नसेची ॥२७॥
दुसरा मंत्र गजाननाला । तया वेळी श्रींनी दिधला । तेव्हा तयांच्या मनाला । आनंद झाला बहुसाळ ॥२८॥
॥ श्लोक ॥ आकाशात् पतित तोय यथा गच्छति सागरम् ॥ सर्व - देव - नमस्कारः केशव प्रति गच्छति ॥२॥
संतोषले त्याचे मन । मग पंडिता जवळ घेवोन । एक मंत्र उपदेशोन । केले पावन तयाते ॥२९॥
॥ श्लोक ॥ इदमेव शिवम् इदमेव शिवम् । इदमेव शिवम् इदमेव शिवः ॥३॥

तीनशे रुपये तयांनी । आणिले होते मुंबईहूनी । त्यांचे काय करावे म्हणोनी । विचारिले समर्थांते ॥३०॥
ऐसा प्रश्न ऐकोनी । समर्थ बोलले त्या लागोनी । त्यांच्या पादुका बनवोनी । येथे आणाव्या सत्वर ॥३१॥
स्वामीसन्निध काही दिन । त्रिवर्ग राहिले आनंदाने । हरिभाऊंचे तनमन । स्वामींचरणी दृढ जडले ॥३२॥
काही दिवस गेल्यावरी । त्रिवर्ग एके अवसरी । उभे राहूनी जोडल्या करी । आज्ञा मागती जावया ॥३३॥
आज्ञा मिळता तयांसी । आनंदे आले मुंबईसी । हरीभाऊंच्या मानसी । ध्यास लागला स्वामींचा ॥३४॥
व्यवहारी वर्तता । स्वस्थता नसेची चित्ता । गोड न लागती संसारवार्ता । चैन नसे क्षणभरी ॥३५॥
असो पुढे त्रिवर्गानी । चांदीच्या पादुका करवोनी । अर्पावया स्वामींचरणी । आले अक्कलकोटाते ॥३६॥
भक्तजनांचा कैवारी । पाहोनिया डोळेभरी । माथा ठेविला चरणांवरी । बहुत अंतरी सुखावले ॥३७॥
चांदीच्या पादुका आणिल्या । त्या श्री चरणीं अर्पण केल्या । समर्थे आदरे घेतल्या । पायी घातल्या त्याच वेळी ॥३८॥
त्या आत्मलिंग पादुका । चौदा दिवसांपर्यंत देखा । पायी वागवी भक्तसखा । दिधल्या नाही कोणाते ॥३९॥
हरीभाऊ एके दिनी । समर्थासन्निध येवोनी । दर्शन घेवोन श्रीचरणी । मस्तक त्यांनी ठेविले ॥४०॥
तो समर्थे त्याप्रती । घेवोनिया मांडीवरती । वरदहस्त सत्वरगती । मस्तकी त्यांचे ठेविला ॥४१॥
म्हणती तू माझा सूत । झालासी आता निश्चित । परिधान करी भगवे वस्त्र । संसार देई सोडोनी ॥४२॥
मग छाटी कफनी झोळी । समर्थे तयांसी दिधली । ती घेवोनी तया वेळी । परिधान केली सत्वर ॥४३॥
आत्मलिंग पादुका सत्वरी । देती हरीभाऊंचे करी । म्हणती जाऊनी सागरतीरी । किल्ला बांधोनी राहावे ॥४४॥
धरु नको आता लाज । उभार माझा यशध्वज । नको करु अन्य काज । जन भजना लावावे ॥४५॥
जाऊनी आता सत्वर । लुटवी आपुला संसार । लोभ मोह अणुमात्र । चित्ती तुवा न धरावा ॥४६॥
आज्ञा ऐकोनिया ऐसी । आनंद झाला मानसी । सत्वर आले मुंबईसी । साधूवेष घेवोनी ॥४७॥
सदगुरुने मस्तकी हस्त । ठेविता झाले ज्ञानवंत । धन्य धन्य ते स्वामीसुत । धन्य स्वामी दयाळ ॥४८॥
सदगुरुचा उपदेश होता । तात्काळ गेली भवव्यथा । उपरती झाली चित्ता । षडविकार निमाले ॥४९॥
बहुत गुरु जगी असती । नाना मंत्र उपदेशिती । द्रव्यप्राप्तीस्तव निश्चिती । ढोंग माजविती बहुत ॥५०॥
तयांचा उपदेश न फळे । आत्मरुपी मन न वळे । सत्यज्ञान काही न कळे । मन न चळे प्रपंची ॥५१॥
तयांसी न म्हणावे गुरु । ते केवळ पोटभरु । भवसागर पैलतीरु । उतरतील ते कैसे ॥५२॥
तैसे नव्हेची समर्थ । जे परमेश्वर साक्षात । मस्तकी ठेविता वरदहस्त । दिव्यज्ञान शिष्यांते ॥५३॥
असो हरीभाऊंनी काय केले । ब्राह्मणांसी बोलाविले । संकल्प करोनी ठेविले । तुळसीपत्र घरावरी ॥५४॥
हरीभाऊ घर लुटविता । तारा नामे त्यांची कांता । ती करी बहुत आकांता । घेत ऊर बडवोनी ॥५५॥
म्हणे जोडोनिया कर । लुटविता तुम्ही संसार । हा नव्हे विचार । दुःख लागेल भोगावे ॥५६॥
आजवर अब्रूने । दिवस काढिले आपण । परी आता अवलक्षण । आपणा काय आठवले ॥५७॥
हांसतील सकल जन । धिक्कारतील पिशून । उपास पडता कोण । खावयाते घालील ॥५८॥
अल्पवयी आपणासी । बुद्धी सुचली ही कैसी । त्यागोनिया संसारसुखासी । दुःखडोही का पडता ॥५९॥
संसारसुख भोगोन । पुढे येता वृद्धपण । मग करावे मोक्षसाधन । सेवावे वन तपार्थ ॥६०॥
आपल्या वडिलांची थोरवी । मनामाजी आणावी । त्यांची कीर्ति मळवावी । उचित नसे आपणा ॥६१॥
तुम्ही संसार सोडोनी । जाऊनी बसाल जरी वनी । तरी मग सांगा कोणी । मजलागी पोसावे ॥६२॥
माझे करिता पाणिग्रहण । अग्नि ब्राह्मण साक्ष ठेवोन । आपण वाहिली असे आण । स्मरण करावे मानसी ॥६३॥
तुम्ही म्हणाल मजसवे । तूहि घरदार सोडावे । मजसमागमे फिरावे । भिक्षा मागत घरोघरी ॥६४॥
तरी संसारसुखासक्त । मी असे जी सत्य सत्य । संसारी मन विरक्त । माझे न होय कदाही ॥६५॥
आता जरी आपण । संसार टाकिला लुटोन । हे केले महत्पुण्य । ऐसे कोण म्हणेल ॥६६॥

कुटुंबा उपवासी मारावे । सर्वस्व धर्म करावे । यासी काय पुण्य कार्य म्हणावे । पाप उलटे होतसे ॥६७॥
विनविते जोडोनी कर । अद्यापि स्वस्थ करा अंतर । आपला हा विचार । सोडोनी द्यावा प्राणप्रिया ॥६८॥
ऐशी तियेची उत्तरे । ऐकोनिया स्वामीकुमरे । समाधान बहुत प्रकारे । करीतसे तियेचे ॥६९॥
परी तारेच्या चित्तात । षडरिपु होते जागत । संसाराचे मिथ्यत्त्व । तियेलागी कळेना ॥७०॥
आशा, मनीषा, भ्रांती आणि । कल्पना वासना या डाकिणी । त्यांनी तिजला झडपोनी । आपणाधीन केलेसे ॥७१॥
त्यायोगे सद्विचार । तियेसी न सुचे अणुमात्र । धरोनिया दुराग्रह । स्वामीसुता बोधीतसे ॥७२॥
षडविकार त्यागोनी । रतला जो स्वामीचरणी । दृढ निश्चय केला मनी । संसार त्याग करावा ॥७३॥
स्त्रियेच्या अंगावरी अलंकार । तेहि लुटविले समग्र । तिये दिधले शुभ्र वस्त्र । परिधान करावया ॥७४॥
आत्मलिंग समर्थे । स्वामीसुताते दिधले होते । त्या पादुका स्वहस्ते । मठामाजी स्थापिल्या ॥७५॥
कामाठीपुऱ्यात त्या समयी । मठ स्थापिला असे पाही । हरीभाऊ होऊनी गोसावी । मठामाजी राहिले ॥७६॥
धन्य धन्य ते स्वामीसुत । गुर्वाज्ञेने झाले विरक्त । परी जन त्याते निंदित । नाना दोष देवोनी ॥७७॥
पूर्वजन्मी तप केले । त्याचे फळ प्राप्त झाले । सदगुरुचरणी विनटले । सर्व फिटले भवदुःख ॥७८॥
इति श्री स्वामीचरित्र सारामृत । नाना प्राकृत कथा संमत । सदा भाविक भक्त परिसोत । षोडशोऽध्याय गोड हा ॥८०॥
श्रीरस्तु । शुभं भवतु ॥

स्वामी समर्थांचा आशीर्वाद "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे."

## अध्याय १७

**॥ सतरावा अध्याय ॥**

श्री गणेशाय नमः ॥

मागील अध्यायी कथा सुंदर । प्रख्यात जे मुंबई शहर । तेथे येऊनी स्वामीकुमर । मठ स्थापिती समर्थांचा ॥१॥

षडविकार जिंकिले । संसाराते त्यागिले । रात्रंदिन रत झाले । स्वामी भजनी सुखाने ॥२॥

स्वात्मसुखी तल्लीन वृत्ती । तेणे हरली संसृति । कवणाची नाही भीती । सदा चित्ती आनंद ॥३॥

स्वामीनामाचे भजन । त्यांचिया चरित्राचे कीर्तन । त्याहुनी व्यवसाय अन्य । स्वामीसुत नेणती ॥४॥

संसाराते सोडोन । बैसले गोसावी होवोन । हे पाहूनी कित्येकजण । हांसताती तयाते ॥५॥

परी त्याचा विषाद चित्ती । स्वामीसुत न मानिती । अंगी बाणली पूर्ण विरक्ति । विषयासक्ति नसेची ॥६॥

स्वामीसुताची जननी । काकूबाई नामे करोनी । तिने हे वृत्त ऐकोनी । दुःख केले अनिवार ॥७॥

मोहावर्ती सापडले । मायावश जे झाले । त्यांसी प्रपंचावेगळे । गोड काही न लागेची ॥८॥

पुत्रवात्सल्येकरोनी पाही । शोक करीत काकूबाई । मुंबईत लवलाही । सुताजवळी पातल्या ॥९॥

गोसावी निजसुता पाहोनी । वक्षःस्थळ घेती बडवोनी । अंग टाकीयले धरणी । बहुत आक्रोश मांडीला ॥१०॥

निजमातेचा शोक पाहोन । दुःखित झाले अंतःकरण । तियेलागी सावरुन । धरिले सत्वर प्रेमाने ॥११॥

तुझ्या उदरी जन्मास आलो । सदगुरुपायी विनटलो । जन्ममरणाते चुकलो । मुक्त झालो सहजची ॥१२॥

धन्य धन्य तू गे जननी । मजलागी प्रसवोनी । मान्य झालीस त्रिभुवनी । काय धन्यता वर्णावी ॥१३॥

अशा प्रकारे स्वामीसुत । मातेचे समाधान करीत । मधुर शब्दे समजावीत । परमार्थ गोष्टी सांगोनी ॥१४॥

परी त्याच्या या गोष्टी । तियेसी गोड न लागती । म्हणे याची भ्रष्ट मती । खचित असे जाहली ॥१५॥

यासी पिशाच्चबाधा झाली । किंवा कोणी करणी केली । याची सोय पाहिजे पाहिली । पंचाक्षरी आणोनी ॥१६॥

त्या समयी प्रख्यात थोर । यशवंतराव भोसेकर । जयांसी देव मामलेदार । सर्व लोक बोलती ॥१७॥

तयांची घेवोन भेटी । विचारावी काही युक्ती । ते जरी कृपा करिती । तरी होय आरोग्य ॥१८॥

ऐसा विचार करोनी पोटी । दर्शना आल्या उठाउठी । सांगितल्या सुताच्या गोष्टी । मुळापासोन सर्वहि ॥१९॥

होवोनिया दीनवदन । करिती विनंती कर जोडोन । म्हणती सर्वज्ञ आपण । उपाय यासी सांगावा ॥२०॥

ऐकोनिया देव मामलेदार । हांसोनी देती उत्तर । त्यासी पिशाच्च लागले थोर । माझेनी दूर नोहेची ॥२१॥

ऐसे उत्तर ऐकोनि । दुःखित झाले अंतःकरणी । मग ते स्वामीसुताची जननी । अक्कलकोटी येतसे ॥२२॥

म्हणे ज्याने वेड लाविले । त्याचीच धरावी पाउले । येणे उपाये आपुले । कार्य सत्य होईल ॥२३॥

असो इकडे स्वामीसुत । मुंबईमाजी वास्तव्य करीत । हिंदू पारसी स्वामीभक्त । त्यांच्या उपदेशे जहाले ॥२४॥

मठ होता कामाठीपुऱ्यात । तेथे जागा नव्हती प्रशस्त । मग दिली कांदेवाडीत । जागा एक भक्तिणीने ॥२५॥

निस्सीम जे स्वामीभक्त । आनंदे भजनी नाचत । कुटील जन त्याते हासत । ढोंग अवघे म्हणती हे ॥२६॥

परी निंदा आणि स्तुती । दोन्ही समान जे मानिती । श्रीचरणांवीण आसक्ति । अन्य विषयावरी नसे ॥२७॥

जन निंदा करिताती । अनेक प्रकारे दूषण देती । परी शांत चित्ते त्याप्रती । उपदेशिती स्वामीसुत ॥२८॥

जे अहंकारे बुडले । सत्य पथाचरण चुकले । नित्य कार्याते विसरले । मोहे पडले भवजाली ॥२९॥

ऐसे जे का मूढ जन । ते भक्ता देती दूषण । परी तेणे अंतःकरण । दुःखित नोहे तयांचे ॥३०॥

तारा नामे त्यांची कांता । तेही त्रास देती स्वामीसुता । परी तयांच्या चित्ता । दुःख खेद नसेची ॥३१॥

प्रथम मुंबई शहरात । शके सत्राशे त्र्याण्णवात । फाल्गुन कृष्ण त्रयोदशीस । स्वामी जयंती केलीसे ॥३२॥

कोणे एके समयासी । नगरकर नाना जोशी । सहज आले मुंबईसी । त्यांनी ऐकिले वर्तमान ॥३३॥

या नगरांत सांप्रत । स्वामीसुत स्वामीभक्त । गोसावी होऊनी राहात । महाज्ञानी असती ते ॥३४॥
एकवार पहावे तयांसी । इच्छा झाली नानांसी । मग कोणे एके समयासी । मठामाजी पातले ॥३५॥
पाहुनी स्वामीसुताप्रती । आनंदले नाना चित्ती । प्रेमानंदे चरण वंदिती । स्तवन करिती तयांचे ॥३६॥
स्वामीसुते तयासी । लावियले स्वामीभक्तीसी । धन्य झाले नाना जोशी । रंगले भजनी समर्थांच्या ॥३७॥
ऐसे कित्येक सज्जन । स्वामीसुते शिष्य करोन । वाढविले महात्म्य पूर्ण । श्रीसमर्थ भक्तींचे ॥३८॥
पुढे जोशी बुवांनी स्वामीची पत्रिका करोनी । ती अर्पावया श्रीचरणी । अक्कलकोटी पातले ॥३९॥
पत्रिका श्रीचरनी अर्पिली । स्वामीमूर्ती आनंदली । समर्थे त्यांसी आज्ञा केली । नगारा वाजवा म्हणोनी ॥४०॥
नगारा वाजविता जोशी । हसू आले समर्थांसी । पाहोनिया स्वभक्तासी । परमानंद जाहला ॥४१॥
अक्कलकोटी स्वामीसुत । श्रीसन्निध भजन करीत । कीर्तनी आनंदे नाचत । लोकलज्जा सोडोनी ॥४२॥
लोकापवादाचे मनी भय । तो भक्ती करील काय । प्रेमानंद चित्त नोहे । भजनी मन लागेना ॥४३॥
त्रिविध जन नानारीती । निंदा स्तुति करिताती । खेदानंद मानिता चित्ती । चित्तवृत्ति द्विधा होय ॥४४॥
असो अक्कलकोट नगरांत । शके सतराशे त्र्याण्णवात । प्रथम स्वामी जयंती करीत । स्वामीसुत आनंदे ॥४५॥
छेली खेडे ग्रामांत । प्रथम स्वामी प्रगट होत । विजयसिंग नामे भक्त । गोट्या खेळत त्यांसवे ॥४६॥
ऐसे स्वामीसुताचे मत । परी दिसे आधाररहित । सत्यासत्य जाणती समर्थ । आपण तेथे अज्ञानी ॥४७॥
स्वामीसुत दिवसेदिवस । स्वामीभक्ती करी विशेष । जन लाविले भजनास । कीर्तिध्वज उभारीला ॥४८॥
मनामाजी धरुनी कामना । कोणी येताचि दर्शना । त्यासी समर्थ करिती आज्ञा । सुताकडे जावयाची ॥४९॥
स्वामीसुतहि त्यांप्रती । मनांतील खूण सांगती । ऐकोनी जन चकित होती । वर्णिती ख्याती सुताची ॥५०॥
एकदा सहज स्वामीसुत । अक्कलकोटी दर्शना येत । तेव्हा समर्थ राजवाड्यात । राहिले होते आनंदे ॥५१॥
राणीचिये आज्ञेवाचोनि । दर्शन नोहे कोणालागोनी । ऐसे वर्तमान ऐकोनी । खिन्न मनी स्वामीसुत ॥५२॥
स्वामीदर्शन घेतल्याविण । तो न सेवी उदकान्न । ऐसे दिवस झाले तीन । निराहार राहिला ॥५३॥
मग वाड्यासमोर जावोन । आरंभिले प्रेमळ भजन । जे करुणरसे भरले पूर्ण । ऐकिले आंतून राणीने ॥५४॥
हा समर्थांचा निस्सीम भक्त । आनंदे भजनी नाचत । समर्थ दर्शनाची धरित । दृढ इच्छा अंतरी ॥५५॥
सेवकांसी म्हणे सत्वरी । तुम्ही जाऊनी या अवसरी । त्य साधूते मंदिरी । प्रार्थोनिया आणावे ॥५६॥
ऐसी राणीची आज्ञा होता । सेवक धावले तत्वता । प्रार्थूनिया स्वामीसुता । मंदिरामाजी आणिले ॥५७॥
पाहोनिया समर्थांसी । उल्हास सुताचे मानसी । धावोनिया वेगेसी । मिठी चरणी घातली ॥५८॥
सदगदित अंतःकरणी । चरण क्षाळिले नयनाश्रूंनी । देहभान गेले विसरोनी । स्वामीपदी सुखावला ॥५९॥
बाळ चुकले मातेसी । ते भेटले बहुत दिवसी । मग तयांच्या आनंदासी । पारावार नसेची ॥६०॥
निजसुताते पाहोनी । आनंदले समर्थ मनी । कर फिरविला मुखावरुनी । हस्ती धरुनी उठविले ॥६१॥
अक्कलकोटी त्या अवसरी । बहुत होते सेवेकरी । परी समर्थांची प्रीति खरी । स्वामीसुतावरी होती ॥६२॥
त्यांत होते जे दुर्जन ते सुताचा उत्कर्ष पाहोन । दूषित होय त्यांचे मन । द्वेष पूर्ण करिताती ॥६३॥
काही उपाय करोन । फिरवोन समर्थांचे मन । स्वामीसुतावरचे प्रेम । कमी करु पाहताती ॥६४॥
स्वामीसुत रात्रंदिन । समर्थांपुढे करिती भजन । पायी खडावा घालोन । प्रेमरंगे नाचती ॥६५॥
एके दिवशी श्रीसमर्थ । बैसले असता आनंदात । स्वामीसुत भजन करीत । पायी खडावा घालोन ॥६६॥
ऐशी वेळ साधोनी । समर्थां सांगितले दुर्जनी । स्वामीसुत हे करणी । योग्य नसे सर्वथा ॥६७॥
बैसला असता आपण । पायी खडावा घालोन । हा नाचतो काय म्हणून । आपुला अपमान करावया ॥६८॥
परकी आणि निजसुत । समान लेखिती जे सत्य । जे सर्वांसी आलिप्त । श्रेष्ठ कनिष्ठ कोण त्यांते ॥६९॥
आता खडावा काढोनी । मग नाचावे त्वां भजनी । ऐशी आज्ञा सुतालागोनी । केली समर्थे त्या वेळी ॥७०॥
तोच उठले कित्येकजण । खडावा घेतल्या काढोन । स्वामीसुताचा अपमान । केला ऐशा प्रकारे ॥७१॥
पाहोनिया ऐशी परी । खिन्न झाला सुत अंतरी । काळजात बोचली सुरी । अपमान दुःखे दुखावला ॥७२॥

मरणाहुनी परम कठीण । दुःख देतसे अपमान । उतरले सुताचे वदन । निस्तेज झाले सत्वर ॥७३॥
तयाते होते जे वैरी । ते आनंदले अंतरी । म्हणती मोडली खोड बरी । अभिमान उतरला ॥७४॥
असो मग स्वामीसुत । ते स्थळ सोडोनी त्वरित । नगराबाहेर येत । मार्ग धरीत मुंबईचा ॥७५॥
अपमान दुःखे दुखावला । अंतरी बहू खिन्न झाला । परतोनी नाही आला । जन्मभरी अक्कलकोटी ॥७६॥
स्वाभिमानी जो नर । त्याचे दुखविता अंतर । ते दुःख जन्मभर । त्याच्या मनी जाचतसे ॥७७॥
त्या दुःखे उत्तरोत्तर । क्षीण झाला स्वामीकुमर । दुःख करी दिवसरात्र । चैन नसे क्षणभरी ॥७८॥
तोची रोग लागला । शेवटी आजारी पडला । ऐसा समाचार समजला । अक्कलकोटी समर्थाते ॥७९॥
स्वामीसुताची जननी । राहातसे त्या स्थानी । तिने हे वर्तमान ऐकोनी । विनवीत समर्थाते ॥८०॥
म्हणे कृपा करोनिया । सुतात ए आणावे या ठाया । कृपादृष्टी पाहोनिया । आरोग्य तया करावे ॥८१॥
मग समर्थे त्या अवसरी । मुंबईस पाठविले सेवेकरी । म्हणती सुताते सत्वरी । मजसन्निध आणावे ॥८२॥
परी सुत त्या सांगाती । आला नाही अक्कलकोटी । अपमान दुःख त्याचे पोटी । रात्रंदिन सलतसे ॥८३॥
सेवेकरी परतोनी आले । समर्थाते वृत्त कथिले । आणखी दुसरे पाठविले । त्यांची गती तीच झाली ॥८४॥
मग सांगती समर्थ । त्यासी घालोनि पेटीत । घेवोनि यावे त्वरित । कोणी तरी जावोनि ॥८५॥
तथापि स्वामीसुत पाही । अक्कलकोटी आला नाही । दिवसेदिवस देही । क्षीण होत चालला ॥८६॥
शेवटी बोलले समर्थ । आता जरी न ये सत्य । तरी तोफ भरुनी यथार्थ । ठेविली ती उडवू की ॥८७॥
याचा अर्थ स्पष्ट होता । तो समजला स्वामीसुता । परी तो न आला अक्कलकोटा । जीवितपर्वा न केली ॥८८॥
आजार वाढला विशेष । श्रावण शुद्ध प्रतिपदेस । केला असे कैलासवास । सर्व लोक हळहळती ॥८९॥
त्या समयी मुंबईत । तयांचे जे शिष्य होत । त्यांसी झाले दुःख अमित । शोकसागरी बुडाले ॥९०॥
अक्कलकोटी त्या दिनी । समर्थ करिती विचित्र करणी । बैसले स्नान करोनी । परी गंध न लाविती ॥९१॥
भोजनाते न उठती । धरणीवरी अंग टाकिती । कोणासंगे न बोलती । रुदन करिती क्षणोक्षणी ॥९२॥
इतुक्यामाजी सत्वर । मुंबईहूनी आली तार । श्रुत झाला समाचार । स्वामीसुत गत झाला ॥९३॥
उदासिनता त्या दिवशी । आली सर्व नगरासी । चैन न पडे काकूबाईंसी । पुसती समर्था क्षणोक्षणी ॥९४॥
मग काकूबाईंने सत्वर । जवळी केले मुंबापूर । तेथे समजला समाचार । परत्र पावला आत्मज ॥९५॥
निजपुत्रमरणवार्ता । ऐकुनी करिती आकांता । तो दुःखद समय वर्णिता । दुःख अंतरी होतसे ॥९६॥
असो मग काकूबाई । अक्कलकोटी लवलाही । परतोनी आल्या पाही । बोलल्या काय समर्थांते ॥९७॥
सुत आपुला भक्त असोन । अकाली पावला का मरण । मग स्मरती जे हे चरण । त्यांचे तारण होय कैसे ॥९८॥
समर्थ बोलले तियेसी । उल्लंघिले आमुच्या आज्ञेसी । संधी सापडली काळासी । ओढूनी बळेची मग नेला ॥९९॥
पुत्रशोके करोन । दुःख करी रात्रंदिन । समर्थ तियेचे समाधान । परोपरी करिताती ॥१००॥
नरजन्मा येऊनी सत्य । भक्ती केली एकनिष्ठ । केले जन्माचे सार्थक । परमपदा पावले ॥१०१॥
उच्च नीच भगवंती । नसे काही निश्चिती । ज्याची असेल जैसी भक्ती । श्रेष्ठ कनिष्ठ तेणेचि ॥१०२॥
धन्य धन्य स्वामीकुमर । उतरला भवौदधि दुस्तर । ख्याती झाली सर्वत्र । कीर्ति अमर राहिली ॥१०३॥
स्वामीसुताच्या गादीवर । कोण नेमावा अधिकारी । ऐसा प्रश्न एके अवसरी । पुसती सेवेकरी समर्थाते ॥१०४॥
ते कथा रसाळ अत्यंत । वर्णिले पुढील अध्यायात । श्रोते होऊनी सावधचित्त । अवधान द्यावे कथेसी ॥१०५॥
जयजय श्रीभक्तपालका । जयजयाजी परम मंगला । विष्णू शंकराची विमला । कीर्ति पसरो सर्वत्र ॥१०६॥
इति श्री स्वामीचरित्र सारामृत । नाना प्राकृत कथा संमत । भाविक भक्त परिसोत । सप्तदशोऽध्याय गोड हा ॥१०७॥
श्री भगवच्चरणार्पणमस्तु ॥ श्रीरस्तु ॥ शुभं भवतुं ॥

स्वामी समर्थांचा आशीर्वाद "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे."

## अध्याय १८

**|| अठरावा अध्याय ||**

श्री गणेशाय नमः ॥ स्वामीसुताच्या गादीवरी । कोण नेमावा अधिकारी । ऐसा प्रश्न सेवेकरी । करिताती समर्थांते ॥१॥
तेव्हा बोलले समर्थ । सेवेकरी असती सांप्रत । परी एकही मजला त्यात । योग्य कोणी दिसेना ॥२॥
जेव्हा येईल आमुच्या मानसी । त्या समयी मोर पांखरासी । अधिकारी नेमू गादीसी । चिंता तुम्ही न करावी ॥३॥
मोर पांखरा मोर पांखरा । समर्थ म्हणती वेळोवेळा । रात्रंदिन तोची चाळा । मोठमोठ्याने ओरडती ॥४॥
आमुची पायाची वीट । जतन करावी नीट । वारंवार म्हणती समर्थ । काकूबाईलागोनी ॥५॥
लपवूनी ठेविले विटेसी । ती दिली पाहिजे आम्हांसी । याचा अर्थ करणासी । स्पष्ट काही कळेना ॥६॥
असो स्वामीसुताचा भ्राता । कोकणांत राहात होता । स्वामीसुत मृत्यु पावता । वर्तमान कळले त्या ॥७॥
तो केवळ अज्ञान । दादा तयांचे अभिधान । त्याचे शरीरी असमाधान । कृश होत चालला ॥८॥
काकूबाईने तयासी । आणविले आपणापासी । एके दिवशी समर्थांसी । दादाप्रती दाखविले ॥९॥
बाळ चालले वाळोनी । यासी अमृतदृष्टीने पाहोनी । निरोगी करावे जी स्वामी । बाई विनवी समर्थांते ॥१०॥
समर्थ बोलले बाईसी । चार वेळा जेवू घाला यासी । आरोग्य होईल बाळासी । चिंता मानसी करु नको ॥११॥
त्याप्रमाणे बाई करिता । दादासी झाली आरोग्यता । समर्थांची कृपा होता । रोग कोठे राहील ॥१२॥
केजगांव मोगलाईत । तेथे नानासाहेब भक्त । त्यांनी बांधिला श्रींचा मठ । द्रव्य बहुत खर्चिले ॥१३॥
श्रींची आज्ञा घेऊनी सत्य । पादुका स्थापाव्या मठात । याकारणे अक्कलकोटी येत । दर्शन घेत समर्थांचे ॥१४॥
ते म्हणती काकूबाईसी । पादुका स्थापन करायासी । तुम्ही पाठवा दादासी । समागमे आमुच्या ॥१५॥
बाई म्हणे तो अज्ञान । तशात शरीरी असमाधान । त्याची काळजी घेईल कोण । सत्य सांगा मजलागी ॥१६॥
परी आज्ञा देतील समर्थ । तरी पाठवीन मी सत्य । मग समर्थांजवळी येत । घेवोनिया दादासी ॥१७॥
समर्थे वृत्त एकोन । म्हणती द्यावे पाठवून । बाळ जरी आहे अज्ञ । तरी सांभाळू तयासी ॥१८॥
काकूबाई बहुत प्रकारे । समर्था सांगे मधुरोत्तरे । दादासी पाठविणे नाही बरे । वर्जावे आपण सर्वाते ॥१९॥
समर्थ तियेसी बोलले । त्यात तुमचे काय गेले । आम्हांसी दिसेल जे भले । तेच आम्ही करु की ॥२०॥
शेवटी मंडळी सांगाती । दादासी पाठविले केजेप्रती । पादुका स्थापन झाल्यावरती । दादा आला परतोनी ॥२१॥
पुढे सेवेकऱ्यां सांगाती । त्यासी मुंबईस पाठविती । ब्रह्मचाऱ्यांसी आज्ञा करिती । यासी स्थापा गादीवरी ॥२२॥
ब्रह्मचारीबुवांजवळी । दादासी नेत मंडळीं । जी समर्थे आज्ञा केली । ती सांगितली तत्काळ ॥२३॥
दादासी करुनी गोसावी । मुंबईची गादी चालवावी । स्वामीसुताची यासी द्यावी । कफनी झोळी निशाण ॥२४॥
ब्रह्मचारी दादासी । उपदेशिती दिवस निशी । गोसावी होऊनी गादीसी । चालवावे आपण ॥२५॥
दादा जरी अज्ञान होता । तरी ऐशा गोष्टीकरीता । नकार म्हणेची सर्वथा । न रुचे चित्ता त्याचिया ॥२६॥
यापरी ब्रह्मचाऱ्यांनी । पाहिली खटपट करोनी । शेवटी दादांसी मुंबईहूनी । अक्कलकोटा पाठविले ॥२७॥
दादास घेऊनी सत्वरी । श्रीसन्निध आले टाळकरी । तेव्हा दादा घेवोनी तुंबरी । भजन करीत आनंदे ॥२८॥
समर्थे ऐसा समयासी । आज्ञा केली भुजंगासी । घेऊनी माझ्या पादुकांसी । मस्तकी ठेव दादाच्या ॥२९॥
मोर्चेल आणूनि सत्वरी । धरा म्हणती त्यावरी । आज्ञेपमाणे सेवेकरी । करिताती तैसेचि ॥३०॥
श्रींच्या पादुका शिरी पडता । उपरती झाली त्याच्या चित्ता । हृदयी प्रगटला ज्ञानसविता । अज्ञान गेले लयाते ॥३१॥
दादा भजनी रंगला । देहभानहि विसरला । स्वस्वरुपी लीन झाला । सर्व पळाला अहंभाव ॥३२॥
धन्य गुरुचे महिमान । पादुका स्पर्श करोन । जहाले तत्काळ ब्रह्मज्ञान । काय धन्यता वर्णावी ॥३३॥
असो दादांची पाहून वृत्ती । काकूबाई दचकली चित्ती । म्हणे समर्थे दादांप्रती । वेड खचित लाविले ॥३४॥

ती म्हणे जी समर्था । आपण हे काय करता । दादांचिया शिरी ठेविता । पादुका काय म्हणोनी ॥३५॥
समर्थ बोलले तयेसी । जे बरे वाटले आम्हासी । तेचि करु या समयासी । व्यर्थ बडबड करु नको ॥३६॥
काकूबाई बोले वचन । एकासी गोसावी बनवोन । टाकिला आपण मारुन । इतुकेचि पुरे झाले ॥३७॥
ऐकोन ऐशा वचनाला । समर्थांसी क्रोध आला । घाला म्हणती बाईला । खोड्यामाजी सत्वर ॥३८॥
काकूबाईने आकांत । करुनिया मांडिला अनर्थ । नाना अपशब्द बोलत । भाळ पिटीत स्वहस्ते ॥३९॥
परी समर्थे त्या समयीं । लक्ष तिकडे दिले नाही । दादांसी बनविले गोसावी । कफनी झोळी अर्पिली ॥४०॥
दुसरे दिवशी दादांसी । समर्थ पाठविती भिक्षेसी । ते पाहूनी काकूबाईसी । दुःख झाले अपार ॥४१॥
लोळे समर्थांच्या चरणांवरी । करुणा भाकी पदर पसरी । विनवीतसे नानापरी । शोक करी अपार ॥४२॥
समर्थांसी हसू आले । अधिकचि कौतुक मांडिले । दादांसी जवळ बोलाविले । काय सांगितले तयासी ॥४३॥
अनुसया तुझी माता । तिजपाशी भिक्षा माग आता । अवश्य म्हणोनी तत्वता । जननीजवळ पातला ॥४४॥
ऐसे बाईंने पाहोनी । क्रोधाविष्ट अंतःकरणी । म्हणे तुझी ही करणी । लोकापवादाकारण ॥४५॥
भिक्षान्न आपण सेवावे । हे नव्हेची जाण बरवे । चाळे अवघे सोडावे । संसारी व्हावे सुखाने ॥४६॥
ऐकोनी वचन । उदास झाले तिचे मन । असो दादा गोसावी होवोन । स्वामीभजनी रंगले ॥४८॥
काही दिवस झाल्यावरी । मग आले मुंबापुरी । स्वामीसुताच्या गादीवरी । बसोन संस्था चालविली ॥४९॥
कलियुगी दिवसेदिवस । वाढेल स्वामी महिमा विशेष । ऐसे बोलले स्वामीदास । येथे विश्वास धरावा ॥५०॥
दोघा बंधूंचे ऐसे वृत्त । वर्णिले असे संकलित । केला नाही विस्तार येथ । सार मात्र घेतले ॥५१॥
इति श्री स्वामीचरित्र सारामृत । नाना प्राकृत कथा संमत । सदा प्रेमळ परिसोत । अष्टदशोऽध्याय गोड हा ॥५२॥
श्रीरस्तु ॥ शुभं भवतु ॥

स्वामी समर्थांचा आशीर्वाद "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे."

## अध्याय १९

**|| एकोणिसावा अध्याय ||**

श्री गणेशाय नमः ॥

एकाग्रचित्ते करिता श्रवण । तेणे होय दिव्य ज्ञान । त्या ज्ञाने परमार्थसाधन । पंथ सुलभ होतसे ॥१॥

सच्चरित्रे श्रवण करिता । परमानंद होय चित्ता । ओळखू ये सत्यासत्यता । परमार्थ प्रपंचाची ॥२॥

या नरदेहा येवोन । काय करावे आपण । जेणे होईल सुगम । दुस्तर हा भवपंथ ॥३॥

ज्यांसी वानिती भले । सज्जन ज्या मार्गे गेले । सर्व दुःखमुक्त झाले । तो पंथ धरावा ॥४॥

बोलणे असो हे आता । वर्णू पुढे स्वामीचरिता । अत्यादरे श्रवण करिता । सर्वार्थ पाविजे निश्चये ॥५॥

प्रसिद्ध आळंदी क्षेत्री । नामे नृसिंहसरस्वती । जयांची सर्वत्र ख्याती । अजरामर राहिली ॥६॥

कृष्णातटाकी क्षेत्रे पवित्र । ती देखिली त्यांनी समस्त । नाना योग्याभासी बहुत । महासाधू देखिले ॥७॥

करावे हठयोगसाधन । ऐसी इच्छा बहुत दिन । नाना स्थाने फिरोन । शोध करीती गुरुचा ॥८॥

जपी तपी संन्यासी । देखिले अनेक तापसी । जे सदा अरण्यवासी । योगाभ्यासी बैसले ॥९॥

एक सूर्यमंडळ विलोकिती । एक पंचाग्निसाधन करिती । एक वायू भक्षिताती । मौन धरिती कितीएक ॥१०॥

एक झाले दिगंबर । एकी केला उर्ध्व कर । एक घालिती नमस्कार । एक ध्यानस्थ बैसले ॥११॥

एक आश्रमी राहोन । शिष्या सांगती गुह्यज्ञान । एक करिती तीर्थाटन । एक पूजनी बैसले ॥१२॥

ऐसे असंख्य देखिले । ज्ञान तयांचे पाहिले । कित्येकांचे चरण धरिले । परि गेले व्यर्थची ॥१३॥

ठयोग परम कठीण । कैसा करावा साध्य आपण । याविषयी पूर्ण ज्ञान । कोणी तयाते सांगेना ॥१४॥

एके समयी अक्कलकोटी । स्वामीदर्शनेच्छा । धरुनी पोटी । आले नृसिंहसरस्वती । महिमा श्रीचा ऐकोनी ॥१५॥

नृसिंहसरस्वती दर्शनासी । येती कळले समर्थांसी । जाणिले त्यांच्या हृदगतासी । अंतरामाजी आधीच ॥१६॥

सन्मुख पाहोनी तयांना । आज्ञाचक्र भेदांतला । एक श्लोक सत्वर म्हटला । श्रवणी पडला तयांच्या ॥१७॥

श्लोक ऐकता तेथेचि । समाधी लागली साची । स्मृति न राहिली देहाची । ब्रह्मारंध्री प्राणवायू ॥१८॥

आश्चर्य करिती सकळ । असो झालिया काही वेळ । समाधी उतरोनी तत्काळ । नृसिंहसरस्वती धावले ॥१९॥

स्वामी पदांबुजांवरी । मस्तक ठेविले झडकरी । सदगदित झाले अंतरी । हर्ष पोटी न सामावे ॥२०॥

उठोनिया करिती स्तुती । धन्य धन्य हे यतिमूर्ती । केवळ परमेश्वर असती । रुप घेती मानवाचे ॥२१॥

मी आज कित्येक दिवस । हठयोगसाधन करायास । केले बहुत सायास । परी सर्व व्यर्थ गेले ॥२२॥

स्वामीकृपा आज झाली । तेणे माझी इच्छा पुरली । चिंता सकल दूर झाली । कार्यभाग साधला ॥२३॥

असो नृसिंहसरस्वती । आळंदी क्षेत्री परतोन येती । तेथेचि वास्तव्य करिती । सिद्धी प्रसन्न जयांना ॥२४॥

बहुत धर्मकृत्ये केली । दूरदूर कीर्ति गेली । काही दिवशी एकेवेळी । अक्कलकोटी पातले ॥२५॥

घेतले समर्थांचे दर्शन । उभे राहिले कर जोडोनि । झाले बहुत समाधान ॥२६॥

पाहोनी नृसिंहसरस्वतीसी । समर्थ बोलले त्या समयासी । लोकी धन्यता पावलासी । वारयोषिता पाळोनी ॥२७॥

तियेसी द्यावे सोडोनी । तरीच श्रेष्ठत्व पावसी जनी । मग सहजचि सुरभुवनी । अंती जासी सुखाने ॥२८॥

ऐकोनी समर्थांची वाणी । आश्चर्य वाटले सकला मनी । नृसिंहसरस्वती स्वामी असोनी । विपरीत केवी करितील ॥२९॥

परी अंतरीची खूण । यति तत्काळ जाणोन । पाहो लागले अधोवदन । शब्द एक न बोलवे ॥३०॥

सिद्धी करोनी प्रसन्न । वाढविले आपुले महिमान । तेचि वारयोषितेसमान । अर्थ स्वामीवचनाचा ॥३१॥

असो तेव्हापासोनि । सिद्धी दिधली सोडोनी । येवोनी राहिले स्वस्थानी । धर्मकृत्ये बहु केली ॥३२॥

यशवंतराव भोसेकर । नामे देव मामलेदार । त्यासीही ज्ञान साचार । समर्थकृपेने जहाले ॥३३॥

ऐसे सच्छिष्य अनेक । श्रीकृपेने ज्ञानी विशेष । ज्यांनी ओळखिले आत्मस्वरुप । महिमा त्यांचा न वर्णवे ॥३४॥
वासुदेव ब्राह्मण थोर । ज्यांची प्रसिद्धी सर्वत्र । इंग्रजी अंमलात अनिवार । होऊनी बंड केले ज्यांनी ॥३५॥
समर्थांची कृपा होता । इच्छित कार्य साधेल तत्वता । ऐसे वाटले त्याचे चित्ता । दर्शनाते पातला ॥३६॥
करी नग्न तलवार । घेवोन आला श्रीसमोर । घालोन साष्टांग नमस्कार । मनामाजी प्रार्थीत ॥३७॥
स्वकार्य चिंतोनि अंतरीं । खड्ग दिधले श्रीच्या करी । म्हणे मजवरी कृपा जरी । तरी खड्ग हाती देतील ॥३८॥
जावोनि बैसला दूर । श्रीनी जाणिले अंतर । त्यांचे पाहोनि कर्म घोर । राजद्रोह मानसी ॥३९॥
लगबगे उठली स्वारी । सत्वर आली बाहेरी । तरवडाचे झाडावरी । तलवार दिली टाकोनी ॥४०॥
वासुदेवराव पाहोनी । खिन्न झाला अंतः करणी । समर्थांते आपुली करणी । नावडे सर्वथा म्हणतसे ॥४१॥
कार्य आपण योजिले । ते शेवटा न जाय भले । ऐसे समर्थे दर्शविले । म्हणूनी न दिले खड्ग करी ॥४२॥
परी तो अभिमानी पुरुष । खड्ग घेवोनि तैसेच । आला परत स्वस्थानास । झेंडा उभारिला बंडाचा ॥४३॥
त्यात त्यासी यश न आले । सर्व हेतू निष्फळ झाले । शेवटी पारिपत्य भोगले । कष्ट गेले व्यर्थचि ॥४४॥
असो स्वामीचे भक्त । तात्या भोसले विख्यात । राहती अक्कलकोटात । राजाश्रित सरदार ॥४५॥
काही कारण जहाले । संसारी मन विटले । मग प्रपंचाते सोडिले । भक्त झाले स्वामींचे ॥४६॥
मायापाश तोडोनी । दृढ झाले स्वामीचरणी । भजन पूजन निशिदिनी । करिताती आनंदे ॥४७॥
अकस्मात एके दिवशी । भयभीत झाले मानसी । यमदूत दिसती दृष्टीसी । मृत्यूसमय पातला ॥४८॥
पाहोनिया विपरीत परी । श्रीचरण धरिले झडकरी । उभा राहिला काळ दूरी । नवलपरी जाहले ॥४९॥
दीन वदन होवोनी । दृढ घातली मिठी चरणी । तात्या करिती विनवणी । मरण माझे चुकवावे ॥५०॥
ते पाहोनी श्रीसमर्थ । कृतान्तासी काय सांगत । हा असे माझा भक्त । आयुष्य याचे न सरले ॥५१॥
पैल तो वृषभ दिसत । त्याचा आज असे अंत । त्यासी न्यावे त्वा त्वरित । स्पर्श याते करु नको ॥५२॥
ऐसे समर्थ बोलले । तोची नवल वर्तले । तत्काळ वृषभाचे प्राण गेले । धरणी पडले कलेवर ॥५३॥
जन पाहोनी आश्चर्य करिती । धन्यता थोर वर्णिताती । बैलाप्रती दिधली मुक्ती । मरण चुकले तात्यांचे ॥५४॥
ऐशा लीला असंख्य । वर्णू जाता वाढेल ग्रंथ । हे स्वामीचरित्र सारामृत । चरित्रसारमात्र येथे ॥५५॥
जयाची लीला अगम्य । ध्याती ज्याते निगमागम । सुर - नर वर्णिताती गुण । अनादिसिद्ध परमात्मा ॥५६॥
नानारुपे नटोनी । स्वेच्छे विचरे जो या जनी । भक्ता सन्मार्ग दाखवोनी । भवसागरी तारीत ॥५७॥
त्या परमात्म्याचा अवतार । श्रीस्वामी यति दिगंबर । प्रगट झाले धरणीवर । जगदुद्धाराकारणे ॥५८॥
त्यांची पदसेवा निशिदिनी । करोनी तत्पर सदा भजनी । विष्णू शंकराचे मनी । हेचि वसो सदैव ॥५९॥
इति श्री स्वामीचरित्र सारामृत । नाना प्राकृत कथा संमत । सदा परिसोत प्रेमळ भक्त । एकोणविसावा अध्याय गोड हा ॥६०॥
॥ श्रीरस्तु ॥ शुभं भवतु ॥

स्वामी समर्थांचा आशीर्वाद "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे."

## अध्याय २०

**|| विसावा अध्याय ||**

श्री गणेशाय नमः ॥ जयजयाजी करुणाकरा । जयजयाजी यतिवरा । भक्तजन संतापहरा । सर्वेश्वरा गुरुराया ॥१॥
लीलावेषधारी दत्ता । सर्वसाक्षी अनंता । विमलरुपा गुरुनाथा । परब्रह्म सनातना ॥२॥
तुझे चरित्र अगाध । केवी वर्णू मी मतिमंद । परी घेतला असे छंद । पूर्ण केला पाहिजे ॥३॥
तुझ्या गुणांचे वर्णन । करिता भागे सहस्त्रवदन । निगमागमासहि जाण । नसे पार लागला ॥४॥
तुझे वर्णावया चरित्र । तुजसम कवी पाहिजेत । तरी अल्पमतीने अत्यल्प । गुणानुवाद का न गावे ॥५॥
वर्णिता समर्थांचे गुण । नाना दोष होती दहन । सांगता ऐकता पावन । वक्ता श्रोता दोघेहि ॥६॥
अक्कलकोटी वास केला । जना दाखविल्या अनंत लीला । उद्धरिले कैक पाप्यला । अदभुत चरित्र स्वामींचे ॥७॥
असो कोणे एके दिवशी । इच्छा धरोनी मानसी । गृहस्थ एक दर्शनासी । समर्थांच्या पातला ॥८॥
करोनिया श्रीची स्तुती । माथा ठेविला चरणावती । तेव्हा समर्थ त्याते वदती । हास्यवदने करोनी ॥९॥
फकिराते देई खाना । तेणे पुरतील सर्व कामना । पक्वान्ने करोनी नाना । यथेच्छ भोजन देईजे ॥१०॥
गृहस्थे आज्ञा म्हणोन । केली नाना पक्वान्ने । फकीर बोलाविले पाच जण । जेवू घातले तयाते ॥११॥
फकीर तृप्त होवोन जाती । उच्छिष्ट उरले पात्रावरती । तेव्ह समर्थ आज्ञापिती । गृहस्थाते सत्वर ॥१२॥
शेष अन्न करी ग्रहण । तुझे मनोरथ होतील पूर्ण । परी त्या गृहस्थाचे मन । साशंक झाले तेधवा ॥१३॥
म्हणे यवन यती अपवित्र । त्यांचे कैसे घेऊ उच्छिष्ट । याती मध्ये पावेन कष्ट । कळता स्वजना गोष्ट हे ॥१४॥
आला मनी ऐसा विचार । तो समर्थास कळला सत्वर । म्हणती हा अभाविक नर । विकल्प चित्ती याचिया ॥१५॥
इतक्यामाजी साहजिक । कोणी भ्रमिष्ट गृहस्थ एक । येवोन स्वामीसन्मुख । स्वस्थ उभा राहिला ॥१६॥
दारिद्र्ये ग्रस्त झाला म्हणोन । भ्रमिष्ट फिरे रात्रंदिन । द्रव्य मेळवाया साधन । त्याजवळी नसे परी ॥१७॥
त्यासी देखोन समर्थ । म्हणती हे उच्छिष्ट घे त्वरित । तो निःशंक मनांत । पात्रावरी बैसला ॥१८॥
त्यासी बोलले समर्थ । तु मुंबापुरी जाई त्वरित । सफल होतील मनोरथ । द्रव्यप्राप्ती होईल ॥१९॥
स्वामीवचनी भाव धरिला । तात्काळ मुंबईस आला । उगाच भटको लागला । द्रव्य मिळेल म्हणोनी ॥२०॥
प्रभात समयी एके दिवशी । गृहस्थ निघाला फिरायासी । येऊन एका घरापाशी । स्वस्थ उभा राहिला ॥२१॥
तो घरातून एक वृद्ध बाई । दार उघडोन घाईघाई । बाहेर येवोनिया पाही । गृहस्थ पडला दृष्टीसी ॥२२॥
तिने बोलाविले त्याला । आसनावरी बैसविला । दहा हजारांच्या दिधल्या । नोटा आणून सत्वरी ॥२३॥
गृहस्थ मनी आनंदला । बाईते आशीर्वाद दिधला । द्रव्यलाभ होता आला । शुद्धीवर सत्वर ॥२४॥
समर्थाचे वचन सत्य । गृहस्था आली प्रचीत । वारंवार स्तुती करीत । स्तोत्र गत स्वामीचे ॥२५॥
समर्थांचे लीला विचित्र । केवी वंदू शके मी पामर । ज्या वर्णिता थोर थोर । श्रमित झाले कविराज ॥२६॥
कोणी दाता नृपवर । दान कराया भांडार । मोकळे करी परी शक्त्यनुसार । याचक नेती बांधोनी ॥२७॥
षड्रस अन्नाचे ढीग पडले । क्षुधित जन तेथे आले । त्यांनी त्यातून भक्षिले । क्षुधा शांत होई तो ॥२८॥
स्वामीचरित्र भांडारातून । रत्ने घेतली निवडोन । प्रेमादरे माळ करोन । श्रोतयांचे कंठी घातली ॥२९॥
श्री स्वामीचरणसरोजी । विष्णुभ्रमर घाली रुंजी । अत्यादरे चरण पूजी । स्तोत्र गातसे ॥३०॥
इति श्री स्वामीचरित्र सारामृत । नाना प्राकृत कथा संमत । सदा ऐकोत भाविक भक्त । विसावा अध्याय गोड हा ॥३१॥
॥ श्रीरस्तु ॥ शुभं भवतु ॥

स्वामी समर्थांचा आशीर्वाद "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे."

## अध्याय २१

**॥ एकविसावा अध्याय ॥**

श्री गणेशाय नमः ॥
निर्मिली सुंदर देवमंदिरे । चौक बैठका नाना प्रकारे । कळस ठेवल्यावरी सारे । पूर्ण झाले म्हणती त्या ॥१॥
स्वामीचरित्र सारामृत । झाले वीस अध्यायापर्यंत । करोनी माझे मुख निमित्त । वदले श्रीस्वामीराज ॥२॥
आता कळसाध्याय एकविसावा । कृपा करोनी वदवावा । हा ग्रंथ संपूर्ण करावा । भक्तजनांकारणे ॥३॥
संपवावा अवतार आता । ऐसे मनामाजी येता । जडदेह त्यागोनि तत्त्वता । गेले स्वस्थानी यतिराज ॥४॥
शके अठराशे पूर्ण । संवत्सर ते बहुधान्य । मास चैत्र पक्ष कृष्ण । त्रयोदशी मंगळवार ॥५॥
दिवस गेला तीन प्रहर । चतुर्थ प्रहाराचा अवसर । चित्त करोनी एकाग्र । निमग्न झाले निजरुपी ॥६॥
षटचक्राते भेदोन । ब्रह्मरंध्रा छेदून । आत्मज्योत निघाली पूर्ण । हृदयामधुनी तेधवा ॥७॥
जवळ होते सेवेकरी । त्यांच्या दुःख झाले अंतरी । शोक करीता नानापरी । तो वर्णिला न जाय ॥८॥
अक्कलकोटीचे जन समस्त । दुःखे करुन आक्रंदत । तो वृत्तान्त वर्णिता ग्रंथ । वाढेल समुद्रसा ॥९॥
असो स्वामींच्या अनंत लीला । जना सन्मार्ग दाविला । उद्धरिले जडमूढाला । तो महिमा कोण वर्णी ॥१०॥
कोकणांत समुद्रतीरी । प्रसिद्ध जिल्हा रत्नागिरी । पालशेत ग्रामामाझारी । जन्म माझा झालासे ॥११॥
श्रेष्ठ चित्तपावन ज्ञातीत । उपनाम असे थोरात । बळवंत पार्वतीसुत । नाम माझे विष्णू असे ॥१२॥
तेथेचि बाळपण गेले । आता कोपरलीस येणे केले । उपशिक्षक पद मिळाले । विद्यालयी सांप्रत ॥१३॥
वाणी मारवाडी श्रेष्ठ । नाम ज्यांचे शंकरशेट । त्यांसी स्नेह झाला निकट । आश्रयदाते ते माझे ॥१४॥
त्यांची स्वामीचरणी भक्ती । भावार्थे पूजन करिती । दिवसा उपजली चित्ती । स्वामीचरित्र श्रवणाची ॥१५॥
ते मजला सांगितले । मी स्वामी गुणानुवाद गाइले । हे स्वामी चरित्र लिहिले । अल्प मतीने अत्यल्प ॥१६॥
शब्द सोपे व्यावहारिक भाषा । प्रत्येक अध्याय लहानसा । आबालवृद्धा समजे असा । लघु ग्रंथ रचिला हा ॥१७॥
प्रथमाध्यायी मंगलाचरण । कार्यसिद्ध्यर्थ देवतास्तवन । आधार स्वामी चरित्रास कोण । हेचि कथन केलेसे ॥१८॥
श्रीगुरु कर्दळीवनातूनी आले । स्वामीरुपे प्रगटले । भुवरी प्रख्यात झाले । हे कथन द्वितीयाध्यायी ॥१९॥
तारावया भक्तजनांला । अक्कलकोटी प्रवेश केला । तेथीचा महिमा वर्णिला । तृतीयाध्यायी निश्चये ॥२०॥
स्वामींचा करावया छळ । आले दोन संन्यासी खल । तेचि वृत्त सकल । चवथ्यामाजी वर्णिले ॥२१॥
मल्हारराव राजा बडोद्यासी । त्याने न्यावया स्वामीसी । पाठविले कारभाऱ्यासी । पाचव्यांत ते कथा ॥२२॥
यशवंतराव सरदार । त्यासी दाविला चमत्कार । तयांचे वृत्त समग्र । सहाव्यात वर्णिले ॥२३॥
विष्णुबुवा ब्रह्मचारी । त्यांची स्वामीचरणांवरी । भक्ती जडली कोणे प्रकारी । ते सातव्यात सांगितले ॥२४॥
शंकर नामे एक गृहस्थ । होता ब्रह्मासमधे ग्रस्त । त्यासी केले दुःखमुक्त । आठव्यात ते कथा ॥२५॥
खर्चोनिया द्रव्य बहुत । त्यांनी बांधिला सुंदर मठ । ते वर्णन समस्त । नवव्यात केलेसे ॥२६॥
चिदंबर दीक्षितांचे वृत्त । वर्णिले दशमाध्यायात । ते ऐकता पुनीत । होती सत्यचि ॥२७॥
अकरावा आणि बारावा । तैसाचि अध्याय तेरावा । बाळाप्पाचा इतिहास बरवा । त्यामाजी निरुपिला ॥२८॥
भक्तिमार्ग निरुपण । संकलित केले वर्णन । तो चवदावा अध्याय पूर्ण । सत्तारक भाविका ॥२९॥
बसप्पा तेली सदभक्त । तो कैसा झाला भाग्यवंत । त्याची कथा गोड बहुत । पंधराव्यांत वर्णिली ॥३०॥
हरीभाऊ मराठे गृहस्थ । कैसे झाले स्वामीभक्त । सोळा सतरा यात निश्चित । वृत्त त्यांचे वर्णिले ॥३१॥

स्वामीसुतांचा कनिष्ठ बंधू । त्यासी लागला भजनछंदू । जे दादाबुवा प्रसिद्धु । अठाराव्यात वृत्त त्यांचे ॥३२॥
वासुदेव फडक्यांची गोष्ट । आणि तात्यांचे वृत्त । वर्णिले एकोणविसाव्यांत । सारांशरुपे सत्य पै ॥३३॥
एक गृहस्थ निर्धन । त्यासी आले भाग्य पूर्ण । तेचि केले वर्णन । विसाव्यांत निर्धारे ॥३४॥
स्वामी समाधिस्त झाले । एकविसाव्यांत वर्णिले । ग्रंथप्रयोजन कविवृत्त निवेदिले । पूर्ण केले स्वामीचरित्र ॥३५॥
शके अठराशे एकोणवीस । वसंतऋतू चैत्र मास । गुरुवार वद्य त्रयोदशीस । पूर्ण केला ग्रंथ हा ॥३६॥
बळवंत नामे माझा पिता । पार्वती माता पतिव्रता । वंदोनी त्या उभयंता । ग्रंथ समाप्त केलासे ॥३७॥
स्वामीनी दिधला हा वर । जो भावे वाचील हे चरित्र । त्यासी आयुरारोग्य अपार । संपत्ती, संतति प्राप्त होय ॥३८॥
त्याची वाढो विमल कीर्ति । मुखी वसो सरस्वती । भवसागर तरोन अंती । मोक्षपद मिळो त्या ॥३९॥
अंगी सर्वदा विनय वसो । वृथाभिमान तो नसो । सर्व विद्यासागर गवसो । भक्तश्रेष्ठा लागूनी ॥४०॥
ज्या कारणे ग्रंथ रचिला । जिही प्रसिद्धीस आणिला । त्यासी रक्षावे दयाळा । कृपाघना समर्था ॥४१॥
मी केवळ मतिमंद । परी भावे घेतला छंद । कृपाळू तू सच्चिदानंद । पूर्ण केला दयाळुवा ॥४२॥
दोन्ही कर जोडोनी । आता हेचि विनवणी । ग्रंथसंरक्षकालोगोनि । सुखी ठेवी दयाळा ॥४३॥
आता ज्ञानी वाचक असती । त्यास करु एक विनंती । मी केवळ हीनमति । कवित्व करु नेणेची ॥४४॥
परी माझी ही आर्ष उत्तरे । वाचावी ऐकावी आदरे । उबग न मानावा चतुरे । स्वामीचरित्र म्हणोनी ॥४५॥
जयजयाजी परमानंदा । वैकुंठवासी श्रीगोविंदा । भक्तारका आनंदकंदा । अनामातीता अभेदा ॥४६॥
अरिमर्दना सर्वेशा । विश्वंभरा अविनाशा । पुराणपुरुषा अनंतवेशा । भवपाशा सोडवी ॥४७॥
जयजयाजी कमलासना । कमलावरा कमलनयना । विधितात कमलवदना । हृदयकमली वसावे ॥४८॥
मत्स्य कूर्म वराह जाण । नृसिंह आणि वामन । परशुराम दशरथनंदन । कृष्ण बौद्ध कलंकी तू ॥४९॥
स्वामीचरित्र सुंदर उद्यान । त्यातील कुसुमे वेचून । सुंदर माळ करोन । आला घेवोनी विष्णू कवि ॥५०॥
आपुल्या कंठी तात्काळ । घालोनी चरणी ठेविला भाल । सदोदित याचा प्रतिपाल । करावा बाळ आपुले ॥५१॥
इति श्री स्वामीचरित्र सारामृत । नाना प्राकृत कथा संमत । सदा परिसोत भाविक भक्त । एकविसावा अध्याय गोड हा ॥५२॥
श्री स्वामीचरणार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥